## आजचे पंचांग

शुक्रवार दि. २० फेब्रुवारी २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत २०८२, विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण, शिशिर ऋतु, माघ मास, कृष्णपक्ष, तृतीया दुपारी २-३९ पर्यंत
दिवस नक्षत्र- उत्तराभाद्रपदा रात्री ८-०८ पर्यंत,
योग- साध्य संध्याकाळी ६-२३ पर्यंत

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## मुसळधार पावसाची शक्यता

देशातील हवामानात सध्या लक्षणीय बदल दिसून येत असून थंडी ओसरत असताना उन्हाची तीव्रता वाढली आहे. अशातच भारतीय हवामान विभाग यांनी महत्त्वाचा अंदाज वर्तवला आहे. बंगालच्या खाडीत कमी दाबाचा पट्टा तयार होत असून त्याचा परिणाम काही भागांत पावसाच्या रूपाने जाणवू शकतो. 21 फेब्रुवारी रोजी अंदमान-निकोबार बेटांवर, तर 22 फेब्रुवारी रोजी दक्षिण तामिळनाडू आणि केरळमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक -१४८ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### राहुल गांधींना गोळ्या घालण्याची धमकी

**नवी दिल्ली :** विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना गोळ्या घालण्याची धमकी देणारा करणी सेनेच्या एका कार्यकर्त्याचा कथित व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. काँग्रेसचे प्रवक्ते पवन खेरा यांनी गुरुवारी १९ फेब्रुवारी रोजी हा व्हिडिओ 'एक्स'वर शेअर केला. या घटनेनंतर राजकीय वातावरण तापले आहे. व्हिडिओमध्ये संबंधित व्यक्ती "जय महाकाल, जय ओम बिर्ला, जय नरेंद्र मोदी" अशा घोषणांसह बोलताना दिसत आहे. संसदेत काँग्रेसच्या २५ खासदारांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याशी गैरवर्तन केल्याचा आरोप करत त्याने संताप व्यक्त केला आहे. "पुन्हा अशी घटना घडली, तर राहुल गांधींना घरात घुसून गोळ्या घालू," अशी धमकी व्हिडिओत दिल्याचे दिसते. त्या व्यक्तीने दावा केला आहे की, संबंधित घटना राहुल गांधी यांच्या सांगण्यावरून घडली. "पुढील २४ तासांत त्या खासदारांवर कारवाई झाली नाही तर प्रत्येकाला गोळ्या घालू," असेही वक्तव्य त्यात करण्यात आले आहे.

### 42 आमदारांना नोटीस

**पाटणा :** निवडणुकीत गैरप्रकार आणि प्रतिज्ञापत्रात माहिती लपवल्याच्या आरोपांवरून पाटणा उच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्ष प्रेम कुमार यांच्यासह ४२ विद्यमान आमदारांना नोटीस बजावल्याने बिहारच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. या कारवाईमुळे सत्ताधारी आणि विरोधी अशा दोन्ही गोटांत अस्वस्थता पसरली आहे. नोटीस मिळालेल्या आमदारांमध्ये ऊर्जा मंत्री विजेंद्र यादव, माजी मंत्री जीवेश मिश्रा, आमदार चेतन आनंद आणि आरजेडीचे आमदार अमरेंद्र प्रसाद यांसारख्या दिग्गजांचा समावेश आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, सत्ताधारी महायुती तसेच विरोधी पक्षातील नेते या कारवाईच्या कक्षेत आले आहेत. त्यामुळे हा वाद एका पक्षापुरता मर्यादित राहिलेला नाही.

## किल्ले शिवनेरीवर छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव उत्साहात साजरा

# 'शिवरायांचा मार्ग हाच सर्वांगीण विकासाचा मार्ग'!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** छत्रपती शिवाजी महाराजांनी दाखवलेला मार्ग हाच सर्वांगीण विकासाचा खरा मार्ग आहे. त्यांच्या कार्याचा आदर्श जगासमोर ठेवण्यासाठी २०३० साली छत्रपती शिवाजी महाराजांची ४०० वी जयंती भव्य आणि जागतिक स्तरावर साजरी केली जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवजन्मभूमी जुन्नर येथे केले. किल्ले शिवनेरीवर आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, आमदार शरद सोनवणे, माजी आमदार अतुल बेनके, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, उपवनसंरक्षक



आशिष ठाकरे, अभिनेते रितेश देशमुख, मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विजय घोगरे आदी उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज नसते तर आज भारताचा इतिहास आणि भूगोल वेगळा असता, असे नमूद करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अनेक राजे-रजवाडे मोगलांच्या आधिपत्याखाली काम करत असताना आई जिजाऊंनी घडवलेल्या शिवरायांनी रयतेचे स्वराज्य स्थापन करून हिंदुस्थानाला नवी दिशा दिली. त्यांनी १८ पगड जातींच्या मावळ्यांना एकत्र आणून स्वराज्य उभे केले. "हे माझे राज्य नसून रयतेचे राज्य आहे," ही त्यांची भूमिका होती. देव, देश आणि धर्मासाठी लढण्याची प्रेरणा देत त्यांनी जनतेला मोगलांच्या जोखडातून मुक्त केले. त्यांच्या राज्यात समता, सन्मान, न्याय आणि स्त्रीसुरक्षा यांना प्राधान्य होते. शेतकरी समाधानी राहील आणि अन्याय-अत्याचार होणार नाहीत अशी व्यवस्था त्यांनी उभी केली, असे मुख्यमंत्री म्हणाले. राज्यकारभारात सुधारणा करताना शिवाजी महाराजांनी सुमारे ५० प्रकारचे कर रद्द करून सुलभ करप्रणाली निर्माण केली. पाणी व जंगल यांचे नियोजन केले. भविष्यातील संकट ओळखून समुद्रमार्गे होणाऱ्या आक्रमणांना रोखण्यासाठी जलदुर्ग उभारले आणि पश्चिम किनारपट्टी सुरक्षित केली. त्यांच्या कारकिर्दीत समुद्रमार्गे आक्रमण करण्याची हिंमत कुणालाही झाली नाही, असे मुख्यमंत्री म्हणाले. राज्यातील गड-किल्ले शिवरायांच्या पराक्रमाची साक्ष देतात, असे सांगून मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, पंतप्रधानांच्या पुढाकाराने शिवनेरीसह छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले जागतिक वारसा स्थळ म्हणून नामांकित झाले असून २७ देशांनी एकमताने मान्यता दिली आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी संबंधित प्रमाणपत्र स्वीकारले. राज्यातील सर्व किल्ले अतिक्रमणमुक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून मराठा सेवा संघाने मांडलेल्या मागण्यांवर सकारात्मक विचार केला जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

### बलशाली महाराष्ट्र घडवू– एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे युगपुरुष होते. त्यांच्या दूरदृष्टीतून उभे राहिलेले स्वराज्य आजही सुशासनाची प्रेरणा देते. शिवरायांच्या विचारांवर चालत बलशाली आणि स्वाभिमानी महाराष्ट्र घडविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. महाराजांनी जलव्यवस्था, अर्थकारण आणि पर्यावरण रक्षणाच्या संकल्पना चारशे वर्षांपूर्वीच राबवल्या. 'शिवराई' ही चलन व्यवस्था त्यांच्या दूरदृष्टीचे प्रतीक आहे. राज्यातील गड-किल्ल्यांचे जतन आणि संवर्धन अधिक वेगाने केले जाईल. बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी वर्षानिमित्त किल्ले स्वच्छता व जतन मोहीम राबवण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

### 'शिवनेरी प्रेरणास्थळ' – सुनेत्रा पवार

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या की, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासाठी शिवनेरी केवळ ऐतिहासिक स्थळ नव्हते, तर ते त्यांच्या विचारांचे प्रेरणास्थळ होते. 'किल्ले शिवनेरी विकास आराखडा' त्यांच्या पुढाकारातून साकार झाला आणि परिसराच्या विकासासाठी निधी उपलब्ध झाला. शिवनेरीचा युनेस्को जागतिक वारसा यादीत समावेश होण्यापूर्वीच राज्यातील गड-किल्ल्यांच्या जतनासाठी तरतूद करण्यात आली होती. जुन्नर तालुक्याला पर्यटन तालुका म्हणून विकसित करण्याचा संकल्प त्यांनी केला होता. आग्रा येथे शिवस्मारक, पानिपत येथे मराठा शौर्य स्मारक तसेच संगमेश्वर आणि तुळापूर येथे स्मारक उभारणीची कामे प्रगतीपथावर असल्याचे त्यांनी नमूद केले.

# खंडाळा घाटात पुन्हा वाहतूक कोंडी

### मुंबई–पुणे एक्स्प्रेसवेवर प्रवाशांचे हाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरील खंडाळा घाट पुन्हा एकदा वाहतूक कोंडीचा केंद्रबिंदू ठरला आहे. गुरुवारी सकाळपासून मुंबईच्या दिशेने जाणारी वाहतूक मुंगीच्या पावलाने सरकत असल्याचे चित्र होते. काही ठिकाणी वाहने दीर्घकाळ जागच्या जागी उभी राहिल्याने प्रवाशांचे हाल झाले. ३ फेब्रुवारी रोजी याच मार्गावर गॅस टँकर उलटल्याने तब्बल ३३ तास वाहतूक ठप्प झाली होती. त्या घटनेनंतर प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र १९ फेब्रुवारी रोजी पुन्हा त्याच परिसरात कोंडी झाल्याने या उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. सकाळी सहा वाजल्यापासूनच लोणावळा–खंडाळा परिसरात दोन्ही दिशांना वाहतूक विस्कळीत झाल्याचे प्रवाशांनी सोशल मीडियावर पोस्ट करून सांगितले.

काही प्रवाशांनी ४९ मिनिटांचा प्रवास करण्यासाठी दीड तासाहून अधिक वेळ लागत असल्याची माहिती दिली. वाहतूक कोंडीचे नेमके कारण अधिकृतपणे स्पष्ट झाले नसले तरी घाटातील अरुंद वळणे, अवजड वाहनांची गर्दी आणि सकाळच्या व्यस्त वेळेत वाढलेला प्रवासाचा ताण ही संभाव्य कारणे मानली जात आहेत.

## सुनेत्राताईंच्या नेतृत्वाखाली पक्ष बळकटीकरणावर भर – आनंद परांजपे

# 'विलिनीकरणाचा प्रश्नच नाही'!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विलिनीकरणाचा कोणताही विषय चर्चेत नसून पक्ष बळकट करणे हीच सध्याची प्राथमिकता असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते आनंद परांजपे यांनी स्पष्ट केले. शरदचंद्र पवार गटाकडून सातत्याने विलिनीकरणाबाबत वक्तव्ये केली जात असल्याचा आरोप करत त्यांनी नाराजी व्यक्त केली.

परांजपे म्हणाले, "आम्हीदेखील आमचं दैवत गमावलं आहे. अजितदादा आपल्यात नाहीत ही भावना कार्यकर्त्यांना आणि



पदाधिकाऱ्यांना आजही अस्वस्थ करते. आम्ही एकमेकांना सावरत आहोत. मात्र अशा वेळी शरद पवार गटाकडून केले जाणारे राजकारण अयोग्य आहे." त्यांनी आरोप केला की, सुप्रिया सुळे यांनी काही चर्चा गौण असल्याचे म्हटले असले तरी आमदार रोहित पवार आणि खासदार अमोल कोल्हे पडद्यामागून विलिनीकरणाचा मुद्दा पुढे करत संभ्रम निर्माण करत आहेत. अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत सखोल चौकशी व्हावी, दोषींवर कठोर कारवाई व्हावी, ही पक्षाची पहिल्या दिवसापासून भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणात सीबीआय चौकशीची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले. केंद्रीय उड्डाण मंत्रालयाकडून एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरोमार्फत चौकशी सुरू असून ब्लॅकबॉक्सचा डेटा रिकव्हर होईल, अशी माहिती दिली गेल्याचे परांजपे म्हणाले. रोहित पवार यांनी ब्लॅकबॉक्ससंदर्भात केलेल्या विधानांवर त्यांनी नाराजी व्यक्त केली. अमोल कोल्हे यांनी एबी फॉर्मबाबत उपस्थित केलेल्या मुद्द्यावर उत्तर देताना परांजपे म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत विविध पक्षांचे उमेदवार वेगवेगळ्या चिन्हांवर उभे राहिल्याची उदाहरणे आहेत. एबी फॉर्म प्रक्रियेबाबत त्यांनी सविस्तर माहिती देत संबंधित जबाबदाऱ्या स्पष्ट केल्या. "विलिनीकरणाचा कोणताही विषय आमच्यासमोर नाही. २६ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या राष्ट्रीय अधिवेशनात सुनेत्रा अजित पवार यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड होणार आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली पक्ष अधिक बळकट करणे आणि अजितदादांचे अपूर्ण स्वप्न पूर्ण करणे ही आमची प्राथमिकता आहे," असे परांजपे म्हणाले. राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, ज्येष्ठ नेते छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष संघटनात्मकदृष्ट्या मजबूत करण्यावर भर दिला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. राज्यात संभ्रम निर्माण करणारी विधाने टाळावीत, असा सल्लाही परांजपे यांनी शरद पवार गटाला दिला.

# सीएएवरील याचिकांची अंतिम सुनावणी ५ मेपासून

### सर्वोच्च न्यायालयाने वेळापत्रक जाहीर केले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** नागरिकत्व (दुरुस्ती) कायदा, २०१९ च्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवरील अंतिम सुनावणी ५ मे २०२६ पासून सुरू होणार असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी स्पष्ट केले. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने प्रकरणे त्या आठवड्यात सुनावणीसाठी अनुक्रमाने नोंदवण्याचे निर्देश दिले. सुनावणीदरम्यान खंडपीठाने प्रकरणांच्या कार्यपद्धतीबाबत रूपरेषा ठरवली. प्रथम अखिल भारतीय गटातील याचिकांची सुनावणी केली जाईल, त्यानंतर आसाम आणि त्रिपुराशी संबंधित प्रकरणे स्वतंत्रपणे



हाताळली जातील, असे न्यायालयाने नमूद केले. सरन्यायाधीशांनी सांगितले की, सीएएविरोधातील याचिका दोन प्रमुख गटांत विभागल्या गेल्या आहेत. एक गट आसाम आणि त्रिपुराशी संबंधित आहे, तर दुसरा उर्वरित देशातील प्रकरणांचा आहे. याचिकाकर्त्यांनी सीएएच्या वैधतेवर प्रश्न उपस्थित करत कायद्याला असंवैधानिक घोषित करण्याची मागणी केली आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की ५ मे रोजी याचिकाकर्त्यांच्या बाजूने पहिल्या सहामाहीत सुनावणी होईल, ६ मे रोजी उर्वरित बाजू मांडली जाईल. त्यानंतर ७ मे रोजी प्रतिवादी केंद्र सरकारच्या बाजूने अर्धा दिवस युक्तिवाद होईल. आसाम आणि त्रिपुराशी संबंधित याचिकांची सुनावणी पुढे १२ मे रोजी होईल. न्यायालयाने आवश्यक असल्यास अतिरिक्त युक्तिवाद आणि कागदपत्रे चार आठवड्यांच्या आत दाखल करण्याची मुभा दिली आहे. मात्र आधीच नोंदवलेल्या लेखी सादरीकरणांवर नव्या याचिका स्वीकारल्या जाणार नसल्याचेही स्पष्ट केले. खंडपीठाने नोडल वकिलांना प्रत्येक गटातील संबंधित याचिका ओळखून दोन आठवड्यांत यादी रजिस्ट्रीकडे सादर करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार रजिस्ट्री प्रकरणांचे वर्गीकरण करेल. या सुनावणीमुळे सीएएविरोधातील दीर्घकालीन न्यायप्रक्रियेचा अंतिम टप्पा सुरू होणार असून, देशभरातील या कायद्यावरील वादाला निर्णायक वळण मिळण्याची शक्यता आहे.

### भिवंडीतील नगरसेवकांवर अपात्रततेची तलवार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** भिवंडी महापालिकेच्या महापौरपदाच्या निवडणुकीत बंडाचे निषाण फडकावणाऱ्या नगरसेवकांना धडा शिकवण्यासाठी भाजपने वेगवान हालचाली सुरू केल्या आहेत. बंडखोर नारायण चौधरी यांच्या नेतृत्वाखालील गटाने काँग्रेसप्रणित 'सेक्युलर फ्रंट'ला पाठिंबा देण्याची घोषणा केली असली, तरी भाजपच्या 'व्हीप'मुळे या बंडखोरांचे नगरसेवकपद धोक्यात येणार आहे. पक्षादेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर 'पक्षांतर बंदी कायद्या'नुसार तातडीने कारवाई करण्याचे संकेत भाजपने दिले आहेत. शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी रोजी भिवंडीच्या महापौर पदासाठी मतदान होत असून, भाजपने स्नेहा पाटील यांना अधिकृत उमेदवारी जाहीर केली.

# पुणे मनपाची धडक कारवाई

### खराडी, बाणेर, हडपसरमध्ये हजारो चौरस फूट अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** शहरातील अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांविरुद्ध पुणे महानगरपालिकेने आक्रमक मोहीम हाती घेतली आहे. गेल्या दोन दिवसांत खराडी, बाणेर–सुस रस्ता, सुस आणि हडपसर परिसरात सुमारे ५० हजार चौरस फूट अनधिकृत बांधकाम हटवण्यात आले. अतिक्रमणांवरही कारवाई करत हातगाड्या आणि पथाऱ्यांवर जप्ती करण्यात आली. १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता खराडी, बाणेर–सुस रस्ता (बीडीपी झोन) तसेच हडपसरच्या नव्या हद्दीतील चिंतामणी नगर आणि दुगड नगर परिसरात व्यापक



कारवाई करण्यात आली. उपआयुक्त सोमनाथ बनकर आणि मुख्य सुरक्षा अधिकारी डॉ. रमेश शेलार यांच्या नियंत्रणाखाली ही मोहीम राबवण्यात आली. जेसीबी यंत्रे, एमएसएफ जवान आणि पोलीस बंदोबस्ताच्या मदतीने ३०,६०० चौरस फूट कच्चे आणि पक्के अनधिकृत बांधकाम पूर्णपणे हटवण्यात आले. यापूर्वी १७ फेब्रुवारी रोजी पेठ सर्वे क्रमांक ६ व ७६, खराडीतील सय्यद नगर, नवीन हडपसर हद्द तसेच सदाशिव पेठ परिसरातही कारवाई करण्यात आली होती. या टप्प्यात १७,५०० चौरस फूट बांधकाम निष्कासित करण्यात आले. त्याचबरोबर १८५ हातगाड्या, पथारी आणि काउंटर जप्त करण्यात आले. महापालिका आयुक्तांच्या आदेशानुसार अतिक्रमण निर्मूलन विभागाने नियोजनबद्ध पद्धतीने ही मोहीम राबवली.

## तंत्रज्ञान सेवेचे माध्यम असावे : पंतप्रधान मोदी

# आकांक्षी भारतासाठी एआयचा जागतिक प्रवास निर्णायक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** कृत्रिम बुद्धिमत्ता हे केवळ तांत्रिक प्रगतीचे साधन नसून 'आकांक्षी भारत'च्या भविष्यास आकार देणारी शक्ती आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी केले. इंडिया एआय इम्पॅक्ट समिटमधील नेत्यांच्या पूर्ण सत्रात बोलताना त्यांनी एआयच्या नैतिक वापरावर भर देत डेटा सार्वभौमत्व, पारदर्शक सुरक्षा नियम आणि मानवी मूल्यांचा आदर यांना प्राधान्य दिले पाहिजे, असे स्पष्ट केले. भारत मंडपम येथे जागतिक नेत्यांच्या उपस्थितीत मोदी म्हणाले की, कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये



अनैतिक वर्तनाला अमर्याद वाव असू शकतो.

त्यामुळे एआयसाठी स्पष्ट नैतिक चौकट तयार करणे अत्यावश्यक आहे. "एआय कंपन्यांवर मोठी जबाबदारी आहे. योग्य वेळी, योग्य हेतूने आणि योग्य पद्धतीने घेतलेले निर्णयच सकारात्मक परिणाम घडवतात," असे त्यांनी सांगितले. भारत ही भगवान बुद्धांची भूमी आहे, असे नमूद करत त्यांनी योग्य आकलनातूनच योग्य कृती घडते, हा संदेश पुन्हा अधोरेखित केला. एआयचा प्रभाव मानवकेंद्रित असावा, यासाठी सर्व देशांनी एकत्र येऊन पथदर्शक आराखडा तयार करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. एआयच्या नैतिक वापरासाठी त्यांनी तीन महत्त्वाच्या सूचना मांडल्या. पहिली, डेटा सार्वभौमत्वाचा आदर राखला गेला पाहिजे. एआय प्रशिक्षणासाठी स्पष्ट आणि सर्वमान्य डेटा फ्रेमवर्क आवश्यक आहे. दुसरी, एआय व्यासपीठांनी सुरक्षेसंदर्भातील नियम पारदर्शक आणि स्पष्ट ठेवावेत. तिसरी, एआयसाठी ठोस मानवी मूल्यांची चौकट असणे गरजेचे आहे. "तंत्रज्ञान कितीही शक्तिशाली असले तरी दिशा नेहमी मानवच ठरवणार आहे," असे मोदी म्हणाले. पंतप्रधानांनी भारताच्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांचा उल्लेख करत युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस अर्थात यूपीआयचे उदाहरण दिले. कठीण परिस्थितीतही यूपीआयमुळे लोकांना सहज आणि सुरक्षित व्यवहार करता आले, तसेच डिजिटल दरी कमी करण्यात त्याची मोठी भूमिका राहिली, असे त्यांनी सांगितले. "गेल्या काही वर्षांत भारताने गतिमान डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा उभारली आहे. आम्ही ती जगासोबतही सामायिक करत आहोत. कारण आमच्यासाठी तंत्रज्ञान हे सत्तेचे साधन नसून सेवेचे माध्यम आहे," असे ते म्हणाले. कृत्रिम बुद्धिमत्ता ही आरोग्य, शिक्षण, कृषी आणि सार्वजनिक सेवांमध्ये परिवर्तन घडवू शकते, असा विश्वास व्यक्त करत मोदी यांनी एआय सर्वसमावेशक आणि सुलभ असावे, असे सांगितले. जागतिक सहकार्य, नैतिक मानदंड आणि मानवकेंद्रित दृष्टिकोन यांच्या आधारे एआयचा विकास केल्यास 'आकांक्षी भारत' जागतिक स्तरावर नेतृत्व करू शकेल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

# मुंबई उच्च न्यायालयात ७९ वर्षांनंतर दिवाणी दावा निकाली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** मुंबई उच्च न्यायालयाने स्वातंत्र्योत्तर काळातील एक दीर्घकाळ प्रलंबित असलेला दिवाणी दावा ७९ वर्षांनंतर निकाली काढत महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. ७ ऑक्टोबर १९४७ रोजी दाखल झालेल्या या खटल्यावर न्यायमूर्ती फरहान पी. दुबाश यांनी ५ फेब्रुवारी २०२६ रोजी अंतिम निर्णय दिला. हा वाद दिवंगत हाजी अलीमोहम्मद हाजी कासम अगबोटवाला यांच्या मालमत्तेच्या वाटपाशी संबंधित होता. या इस्टेटमध्ये मुंबईतील दहिसर गावाचा संपूर्ण परिसर समाविष्ट असून, सुमारे २८९१ एकर क्षेत्रफळाचा समावेश होता. मालमत्तेच्या व्यवस्थापनासाठी न्यायालयाने १९५० मध्ये कोर्ट रिसीव्हरची नियुक्ती केली होती. १९५२ मध्ये प्राथमिक हुकूमनामा काढून वारसांचे कायदेशीर हक्क निश्चित करण्यात आले. मात्र त्यानंतरही विविध दावे, हरकती आणि वारसांमधील मतभेदांमुळे प्रकरण दीर्घकाळ न्यायालयात प्रलंबित राहिले. गेल्या आठ दशकांत मूळ पक्षकारांचे निधन झाले आणि त्यांचे वारस न्यायालयीन लढाई पुढे नेत राहिले. अखेरीस चौथ्या पिढीतील सर्व वारसांनी एकत्र येत परस्पर संमतीच्या अटी मान्य केल्या. न्यायालयाने या संमती अटी स्वीकारत दावा निकाली काढला. या निकालामुळे उच्च न्यायालयाच्या इतिहासातील सर्वाधिक कालावधी प्रलंबित असलेल्या प्रकरणांपैकी एकाला पूर्णविराम मिळाला आहे. न्यायालयीन प्रक्रियेत दीर्घकाळ अडकलेल्या खटल्याच्या समाप्तीमुळे न्यायव्यवस्थेच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

## संपादकीय

### एआयची शर्यत आणि भारताचा संतुलित मार्ग

कृत्रिम बुद्धिमत्ता पुढील औद्योगिक क्रांती मानली जाते. अमेरिका आणि चीन यांच्यातील स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर भारताने एआय इम्पॅक्ट समिटद्वारे



आपली महत्त्वाकांक्षा स्पष्ट केली आहे. मात्र प्रगतीसोबत पर्यावरणीय आणि सामाजिक परिणामांचा विचार करूनच या तंत्रक्रांतीचा मार्ग आखावा लागणार आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता ही पुढील औद्योगिक क्रांती ठरणार, याबद्दल आता दुमत उरलेले नाही. वाफेचे इंजिन, वीज आणि संगणक यांनंतर मानवजातीच्या उत्पादनशक्तीला, ज्ञानाला आणि निर्णयक्षमतेला सर्वाधिक झेप देणारे तंत्रज्ञान म्हणून एआयकडे पाहिले जाते. जगातील महासत्तांमध्ये यावरून सुरू असलेली स्पर्धा ही केवळ तांत्रिक नाही; ती आर्थिक, सामरिक आणि राजकीय वर्चस्वाची शर्यत आहे. अशा वेळी नवी दिल्लीतील एआय इम्पॅक्ट समिट हा केवळ परिषदांचा सोहळा नव्हता; तो भारताने दिलेला स्पष्ट संदेश होता की आपण या शर्यतीत प्रेक्षक नाही. अमेरिका आणि चीन या दोन देशांनी एआय क्षेत्रात प्रचंड गुंतवणूक केली आहे. त्यांच्याकडे संशोधन, भांडवल, डेटा आणि संगणकीय क्षमता यांचा मोठा साठा आहे. तरीही भारताने या परिषदेतून दाखवून दिले की एआयचा अर्थ केवळ महाकाय मॉडेल्स, अब्जावधी डॉलरची गुंतवणूक आणि जागतिक तंत्रकंपन्यांचे आधिपत्य एवढाच नाही. भारताची ताकद वेगळी आहे. प्रचंड लोकसंख्या, विविध भाषा, मोठ्या प्रमाणात डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञान स्वीकारणारा समाज ही आपली भक्कम भांडवल आहे. त्यामुळे भारत एआयचा केवळ ग्राहक राहणार नाही, तर उत्पादक आणि नियमनिर्माता बनण्याची महत्त्वाकांक्षा बाळगतो, हे या समिटने स्पष्ट केले. एआय ही संगणक विज्ञानाची शाखा आहे असे सांगणे सोपे आहे. प्रत्यक्षात ती मानवी मेंदूच्या काही क्षमतांचे यांत्रिकीकरण आहे. शिकणे, विश्लेषण करणे, नमुने ओळखणे आणि त्यावर निर्णय घेणे या प्रक्रियेतून मशीन अधिक सक्षम बनते. आरोग्यसेवेत रोगनिदान, कृषी क्षेत्रात पीक अंदाज, उद्योगात स्वयंचलित उत्पादन, वित्तीय क्षेत्रात जोखीम विश्लेषण आणि हवामान अभ्यासात गुंतागुंतीच्या गणनांचे निराकरण अशा अनेक क्षेत्रांत एआयची छाप दिसते. म्हणूनच ही शक्ती ज्याच्या हाती असेल तो पुढील दशकात आघाडीवर राहील. भारताचा दृष्टिकोन काहीसा वेगळा आहे. स्पर्धा आणि वर्चस्वाच्या चौकटीत न अडकता लोक, ग्रह आणि प्रगती या त्रिसूत्रीवर आधारित एआय विकासाचा आग्रह भारताने धरला आहे. तंत्रज्ञान हे मानवकेंद्रित असावे, सामाजिक न्यायाला हातभार लावणारे असावे आणि पर्यावरणस्नेही असावे ही भूमिका महत्त्वाची आहे. विकसनशील देशांसाठी एआय ही मोठी संधी आहे. परंतु ती काही निवडक कंपन्यांच्या हातात केंद्रीत झाली तर असमानता अधिक वाढेल. त्यामुळे कमी संसाधनांत चालणारी, बहुभाषिक आणि मर्यादित इंटरनेट सुविधेतही कार्यक्षम ठरणारी मॉडेल्स विकसित करण्याची गरज आहे. भारताच्या खेड्यापाड्यांत, लघुउद्योगांत आणि स्थानिक प्रशासनात एआय पोहोचली तरच तिचे लोकशाहीकरण होईल. या तेजस्वी चित्राला एक सावलीही आहे. एआयची भूक ही केवळ डेटाची नाही तर पाणी आणि विजेचीही आहे. जगभरात उभारली जाणारी डेटा सेंटर्स ही या तंत्रक्रांतीची अदृश्य कारखाने आहेत. त्यांची संख्या आणि आकार झपाट्याने वाढत आहे. एका मध्यम आकाराच्या केंद्राचा दैनंदिन पाणी वापर लाखो गॅलनमध्ये मोजला जातो. मोठी केंद्रे तर लहान शहरांच्या गरजेइतके पाणी वापरतात. अलीकडच्या काळात अमेरिकेतील डेटा सेंटर्सचा पाणी वापर शेकडो दशलक्ष गॅलन दररोज इतका असल्याचे दिसून आले आहे. काही राज्यांत पुढील काही वर्षांत हा आकडा अनेक पटींनी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जाते. ऊर्जेची बाब आणखी गंभीर आहे. पारंपरिक डेटा सेंटर्स हजारो घरांच्या वीज वापराइतकी वीज वापरतात. एआय केंद्रित महाकाय केंद्रे लाखो घरांच्या समतुल्य ऊर्जा वापरतात. जगभरातील डेटा सेंटर्सचा वार्षिक वीज वापर काही मध्यम आकाराच्या देशांच्या एकूण वापराइतका आहे. पुढील दशकात तो मोठ्या प्रमाणात वाढेल असा अंदाज आहे. या ऊर्जानिर्मितीतून होणारे कार्बन उत्सर्जन ही वेगळीच चिंता आहे. भारताने जर एआय साठवणूक आणि संगणकीय केंद्रे मोठ्या प्रमाणावर उभारण्याचा मार्ग स्वीकारला तर पाणी आणि विजेवरील ताण वाढणार हे उघड आहे. भारतातील अनेक भागांत आधीच पाण्याची टंचाई आहे. वीज उत्पादनात कोळशाचा मोठा वाटा असल्याने कार्बन उत्सर्जनही जास्त आहे. अशा परिस्थितीत एआयच्या नावाखाली पर्यावरणीय ताण वाढवणे हे दूरदृष्टीचे ठरणार नाही. म्हणून भारताचा एआय विकास आराखडा हरित ऊर्जेवर आधारित असावा, पाणी पुनर्वापर तंत्रज्ञानाचा वापर करावा आणि ऊर्जा कार्यक्षम पायाभूत सुविधा उभाराव्यात अशी अपेक्षा आहे. येथेच भारताची खरी कसोटी आहे. एका बाजूला महासत्तांशी स्पर्धा, दुसऱ्या बाजूला शाश्वत विकासाची जबाबदारी. संतुलित मार्ग निवडणे आवश्यक आहे. स्वदेशी संशोधनाला चालना, बहुभाषिक मॉडेल्सचा विकास, कौशल्यविकास, विद्यापीठ आणि उद्योग यांचे सहकार्य आणि स्पष्ट नियमन या सर्व गोष्टींची सांगड घालावी लागेल. केवळ परिषदा आणि घोषणांनी हे साध्य होणार नाही.

# राफेल : मॅक्रॉन भेटीत भारताची अपेक्षा!

**फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या भारत भेटीच्या पार्श्वभूमीवर ११४ राफेल विमानांच्या खरेदीस दिलेली प्राथमिक मंजुरी अधिक महत्त्वाची ठरते. हवाई दलाच्या तुटवड्याची भरपाई करताना या व्यवहारातून स्वदेशी क्षमतांना चालना मिळेल का, हा खरा प्रश्न आहे.**



फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन सध्या भारतात आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद, सामरिक सहकार्य आणि द्विपक्षीय चर्चांचा विस्तृत अजेंडा त्यांच्या भेटीपुढे आहे. परंतु या सर्व चर्चांच्या पाठीमागे एक ठोस वास्तव उभे आहे ते म्हणजे भारताच्या हवाई दलाची घटती ताकद. अशा वेळी संरक्षण अधिग्रहण परिषदेने दसॉल्ट एव्हिएशनकडून ११४ राफेल विमानांच्या खरेदीस दिलेली प्राथमिक मंजुरी ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसून सामरिक गरजेची कबुली आहे. भारतीय हवाई दलाच्या स्क्वॉड्रनची संख्या सध्या सुमारे २९ वर आल्याची चर्चा आहे. अधिकृत मान्य गरज किमान ४२ स्क्वॉड्रनची. म्हणजेच तफावत चिंताजनक आहे. सीमावर्ती आव्हाने वाढलेली असताना आणि दोन आघाड्यांच्या संभाव्य तणावाची शक्यता लक्षात घेता ही कमतरता दुर्लक्षित करता येत नाही. त्यामुळे ११४ राफेल विमानांच्या प्रस्तावाला दिलेली मंजुरी तातडीच्या गरजेचा प्रतिसाद आहे. या प्रस्तावानुसार १८ विमाने थेट फ्रान्सकडून येणार असून उर्वरित ९६ विमाने भारतात खासगी उद्योगांच्या भागीदारीत तयार केली जाणार आहेत. सुमारे ३.२५ ट्रिलियन रुपयांच्या या व्यवहाराला अंतिम रूप मिळण्यासाठी मंत्रिमंडळाची मंजुरी आणि दोन्ही देशांतील उच्चस्तरीय चर्चांची आवश्यकता आहे. मॅक्रॉन यांच्या भेटीमुळे या प्रक्रियेला गती मिळण्याची शक्यता आहे. भारतासाठी येथे दोन अपेक्षा स्पष्ट आहेत. पहिली म्हणजे वितरणात विलंब होऊ नये. दुसरी म्हणजे स्थानिकीकरणाचा आराखडा ठोस असावा. राफेलची क्षमता आज वादाच्या पलीकडे आहे. अत्याधुनिक रडार, दीर्घ पल्ल्याची क्षेपणास्त्रे आणि बहुउद्देशीय वापरामुळे हे विमान आघाडीवरील परिस्थितीत निर्णायक ठरते. भारतीय वायुदलात आधीपासून ३६ राफेल आहेत. मात्र सर्व विमाने कायमस्वरूपी तैनात करता येत नाहीत. देखभाल, प्रशिक्षण आणि तांत्रिक चक्रामुळे प्रत्यक्ष उपलब्धता मर्यादित राहते. त्यामुळे अतिरिक्त १८ विमाने लवकर मिळणे आवश्यक आहे. मात्र प्रश्न केवळ राफेलपुरता मर्यादित नाही. मिग, जग्वार आणि मिराज २००० ही जुनी विमाने टप्प्याटप्प्याने सेवेतून निवृत्त होणार आहेत. त्यांची जागा भरण्यासाठी नियोजनबद्ध पावले उचलावी लागतील. या व्यवहारात दोन आसनी प्रशिक्षण विमानांचा समावेश ही सकारात्मक बाब आहे. प्रशिक्षण साखळी मजबूत नसेल तर आधुनिक तंत्रज्ञानाचा पुरेपूर उपयोग होत नाही. मॅक्रॉन यांच्या भेटीत भारत फ्रान्ससमोर केवळ खरेदीदार म्हणून उभा नाही. तो सामरिक भागीदार म्हणून उभा आहे. ९६ विमाने भारतात तयार करण्याचा प्रस्ताव ही संधी आहे. खासगी उद्योगांचा सहभाग, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि पुरवठा साखळीचे स्थानिकीकरण यांवर ठोस करार झाला तरच या व्यवहाराला दीर्घकालीन अर्थ प्राप्त होईल. अन्यथा ही केवळ आयातीची पुनरावृत्ती ठरेल. तेजस कार्यक्रमाचा अनुभव येथे धडा देणारा आहे. स्वदेशी लढाऊ विमानाची संकल्पना चार दशकांपूर्वी मांडली गेली. प्रगती झाली, परंतु इंजिन पुरवठ्यातील विलंब आणि उत्पादन क्षमतेतील अडचणींमुळे अपेक्षित वेग साधता आला नाही. एमके १ ए प्रकारातील विमानांची मोठी मागणी असूनही वितरणात अडथळे आहेत. परिणामी हवाई दलाला परदेशी पर्यायांकडे वळावे लागत आहे. हा विरोधाभास दूर करण्यासाठी धोरणात्मक सातत्य आवश्यक आहे. राफेल व्यवहाराचे स्वागत करणे योग्य आहे. परंतु त्याच वेळी प्रत्येक मोठ्या आयातीच्या वेळी आपण स्वतःला हा प्रश्न विचारायला हवा की स्वदेशी क्षमतांचा पाया का मजबूत होत नाही. संशोधन खर्च, उच्च दर्जाचे अभियांत्रिकी शिक्षण, चाचणी सुविधा आणि उद्योग क्षेत्रातील गुंतवणूक या सर्वांचा एकात्मिक विचार व्हायला हवा. अन्यथा आयात हीच सवय बनेल. मॅक्रॉन यांच्या उपस्थितीत होणाऱ्या चर्चांमध्ये भारताने वेळेवर वितरण, देखभाल सुविधा आणि भविष्यातील उन्नतीकरण याबाबत स्पष्ट हमी मागितली पाहिजे. संरक्षण व्यवहारांत विलंब ही सामान्य बाब मानली जाते. परंतु हवाई दलाच्या तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर विलंब परवडणारा नाही. भारत आणि फ्रान्स यांच्यातील सामरिक भागीदारी अनेक वर्षांची आहे. संयुक्त राष्ट्रांपासून इंडो पॅसिफिकपर्यंत अनेक विषयांवर दोन्ही देशांची भूमिका जुळते. राफेल व्यवहार त्या नात्याचा एक महत्त्वाचा अध्याय आहे. मात्र या अध्यायाचा शेवट केवळ विमानांच्या वितरणात होऊ नये. तो तंत्रज्ञान, कौशल्य आणि स्वावलंबनाच्या दिशेने उघडणाऱ्या नव्या पर्वात व्हायला हवा. हवाई दलाची तातडीची गरज भागवणे अपरिहार्य आहे. परंतु त्याहून मोठी गरज आहे ती दीर्घकालीन धोरणात्मक स्पष्टतेची. राफेल खरेदी हा आवश्यक निर्णय आहे. आता तो भारताच्या संरक्षण स्वावलंबनाच्या व्यापक आराखड्याशी जोडणे हीच खरी कसोटी ठरेल. मॅक्रॉन यांच्या भेटीने या व्यवहाराला राजनैतिक अधोरेखा मिळाली आहे; आता त्याला सामरिक गती मिळणे आवश्यक आहे. भारताला केवळ आधुनिक विमाने नकोत, तर आधुनिक विचारांची संरक्षण नीती हवी आहे. आयात, सहउत्पादन आणि स्वदेशी संशोधन यांची स्पष्ट सांगड घातली तरच हवाई सामर्थ्य टिकाऊ बनेल. अन्यथा प्रत्येक दशकात तुटवड्याची पुनरावृत्ती होत राहील. राफेल करार हा तात्पुरत्या पोकळीचा उपाय आहे; त्याला दीर्घकालीन आत्मनिर्भरतेच्या दिशेने नेणे हीच खरी राष्ट्रीय जबाबदारी आहे.

## विद्यापीठ उड्डाणपुलाच्या कामात त्रुटी

### पीएमआरडीएचे टाटा सिमेन्सला तातडीचे पत्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : बहुप्रतीक्षित हिंजवडी–शिवाजीनगर मेट्रो प्रकल्पांतर्गत आचार्य आनंदऋषीजी (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रवेशद्वार) चौकातील दुमजली उड्डाणपुलाच्या कामात किरकोळ त्रुटी आढळल्याने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) टाटा सिमेन्स कंपनीला तातडीचे पत्र पाठवले आहे. उर्वरित कामे पूर्ण करून आवश्यक दुरुस्त्या झाल्यानंतरच दुहेरी उड्डाणपुलाची दुसरी बाजू सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



औंध ते शिवाजीनगर दिशेच्या बाजूचे काम पूर्ण झाल्यानंतर २० ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करून ती वाहतुकीसाठी खुली करण्यात आली होती. बाणेरकडील बाजू सुरू करण्याची तयारी सुरू असताना पुलाखाली असुरक्षित साहित्य, राडारोडा, अयोग्यरीत्या साठवलेली उपकरणे आणि अनावश्यक लोखंडी अडथळे आढळून आले. यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून अपघाताची शक्यता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी स्थापत्य आणि सुरक्षात्मक लेखापरीक्षण करण्याची मागणी पीएमआरडीएकडे केली होती. त्यानंतर प्राधिकरणाने तातडीने हालचाल करत संबंधित कंपनीला कामे वेळेत पूर्ण करून त्रुटी दूर करण्याचे निर्देश दिले.

हिंजवडी–शिवाजीनगर मेट्रो मार्ग, स्थानके आणि दुहेरी उड्डाणपुलाची संरचनात्मक कामे उच्च दर्जाची व व्यवस्थित झाल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र किरकोळ कामांतील उणिवा लवकरात लवकर दूर करण्यात येतील, असे मुख्य अभियंता रिनाज पठाण यांनी सांगितले.

## महापालिकेच्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत नगरसेवकांनी प्रशासनाला सुनावले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : अपुरा पाणीपुरवठा आणि अशुद्ध पाण्याच्या समस्येवरून महापालिकेच्या फेब्रुवारी महिन्यातील पहिल्याच सर्वसाधारण सभेत सर्व पक्षीय नगरसेवकांनी प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले. वारंवार पाठपुरावा करूनही पाणीपुरवठा विभागाकडून दखल घेतली जात नसल्याची तक्रार सभागृहात करण्यात आली. यावर क्षेत्रीय कार्यालयनिहाय नगरसेवकांसोबत बैठक घेऊन प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, असे आदेश महापौर मंजूषा नागपुरे यांनी प्रशासनाला दिले.

सभेच्या सुरुवातीलाच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या नगरसेविका प्रिया गदादे यांनी जनता वसाहतमधील ड्रेनेज आणि पाणीपुरवठा वाहिन्यांचा मुद्दा उपस्थित केला. मुख्य रस्त्यावरील ड्रेनेज लाईन खराब झाल्याने सांडपाणी रस्त्यावर येत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

रमजानचा महिना सुरू असताना कोंढवा आणि महंमदवाडी भागात गेल्या १५ दिवसांपासून पुरेशा प्रमाणात पाणी मिळत नसल्याची तक्रार संबंधित नगरसेवकांनी केली. महापालिकेत समाविष्ट झालेल्या गावांमध्ये पाण्याचा प्रश्न गंभीर होत चालल्याचेही सभासदांनी सांगितले. "या भागांमध्ये पाणी अत्यंत कमी दाबाने दिले जाते. काही ठिकाणी प्रतिव्यक्ती दहा लिटरही पाणी मिळत नाही.

## पुणे पोलिसांची मोठी कारवाई; संभाव्य खुनाचा कट उधळला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : सूड उगवण्यासाठी आखलेला संभाव्य खुनाचा कट पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेतील खंडणीविरोधी पथकाने उधळून लावला आहे. 'शार्प शुटर'ला सुपारी देऊन गावठी पिस्तुल उपलब्ध करून देण्यात आल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत चेतन ऊर्फ बाळ्या सिद्धनाथ जाधव (वय २६, रा. दांडेकर पूल) याला अटक केली. त्याच्याकडून एक गावठी पिस्तुल जप्त करण्यात आले आहे.

या प्रकरणी सिंधु ऊर्फ आक्का धोत्रे, सिन्नु झरेकर, पिंकी रेणुसे, गणेश रेणुसे, अमन झरेकर (सर्व रा. सिंहगड रोड, दत्तवाडी), सुमित माने (रा. हडपसर), निशांत राऊत आणि बापू कांबळे (दोघे रा. अप्पर बिबवेवाडी) यांच्याविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ऑक्टोबर २०२४ मध्ये संतोष ऊर्फ भावड्या साळुंखे याच्यावर धारदार शस्त्राने हल्ला झाला होता.

या प्रकरणात पर्वती पोलीस ठाण्यात खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल होऊन आरोपींवर मोक्का अंतर्गत कारवाई झाली होती. त्यातील गणेश रेणुसे सध्या जामिनावर बाहेर आहे.

साळुंखे सूड उगवू शकतो, या भीतीतून रेणुसेच्या नातेवाईकांनी आधीच त्याचा खून करण्याचा कट रचल्याचे तपासात उघड झाले. काम पूर्ण झाल्यानंतर ठरावीक रक्कम देण्याचे ठरले होते, अशी माहिती चौकशीत समोर आली असून पुढील तपास सुरू आहे.

## बिबवेवाडी, हडपसरमध्ये भरधाव वाहनांचा कहर

### दोन वेगवेगळ्या अपघातांत पादचारी व दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : शहरातील बिबवेवाडी आणि हडपसर परिसरात घडलेल्या दोन भीषण अपघातांत दोन तरुणांचा मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. भरधाव वाहनांच्या धडकेत हे अपघात घडले असून संबंधित वाहनचालकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.




**बिबवेवाडीत पादचारी तरुणाचा मृत्यू**

बिबवेवाडी परिसरात भरधाव वाहनाच्या धडकेत पादचारी तरुणाचा मृत्यू झाला. नितीन वसंत कांबळे (रा. भीमदीप वसाहत, बिबवेवाडी) असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत कांबळे यांचे भाऊ सचिन (वय ४५) यांनी बिबवेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १६ फेब्रुवारी रोजी सकाळी अकराच्या सुमारास नितीन कांबळे स्वामी विवेकानंद रस्त्यावरून जात असताना भरधाव वाहनाने त्यांना धडक दिली. अपघातानंतर चालक घटनास्थळी न थांबता पसार झाला. जखमी अवस्थेत कांबळे यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. पोलीस हवालदार गायकवाड या प्रकरणाचा तपास करत आहेत.

**हडपसरमध्ये ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार ठार**

दुसरी घटना हडपसरमधील भेकराईनगर परिसरात घडली. भरधाव ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाला. शिवम चंद्रकांत माने (वय २३, रा. गोविंदनगर, वाखरी विसावा, पंढरपूर, जि. सोलापूर) असे मृत तरुणाचे नाव आहे.

याबाबत शिवमचा भाऊ शुभम (वय २५) यांनी फुरसुंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, बुधवारी (१८ फेब्रुवारी) दुपारी साडेबाराच्या सुमारास शिवम हडपसर-सासवड रस्त्यावरील फुरसुंगी भागातून जात असताना भेकराईनगरमधील शिवशक्ती चौकात भरधाव ट्रकने त्याच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात शिवम गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले; मात्र उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. अपघातानंतर ट्रकचालक पसार झाला असून पोलीस उपनिरीक्षक धुमाळ तपास करत आहेत.

### १२ सदस्यीय समितीची स्थापना; बांधकाम परवानग्या व विकास प्रक्रियेला मिळणार दिलासा

## पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीच्या निळ्या-लाल पुररेषांचे नव्याने सर्वेक्षण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड शहरातून वाहणाऱ्या पवना, इंद्रायणी आणि मुळा नद्यांच्या निळ्या व लाल पुररेषांचे नव्याने सर्वेक्षण करण्यात येणार आहे. यासाठी राज्य शासनाने १२ सदस्यीय उच्चस्तरीय समिती स्थापन केली असून, दोन महिन्यांत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ही माहिती चिंचवडचे भाजप आमदार शंकर जगताप यांनी दिली.



आमदार जगताप म्हणाले की, पिंपरी-चिंचवडसह राज्यातील प्रमुख शहरांमध्ये नद्यालगतच्या निळ्या आणि लाल पुररेषांबाबत अनेक प्रश्न प्रलंबित होते. निळ्या पूररेषेत झालेली अधिकृत व अनधिकृत बांधकामे, तसेच एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (यूडीसीपीआर)मुळे निर्माण झालेल्या अडचणींमुळे नवीन विकासकामांवर मर्यादा आल्या होत्या. परिणामी, बांधकाम परवानग्या, पुनर्विकास प्रस्ताव आणि मालमत्ता धारकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. सध्याच्या निळ्या आणि लाल पुररेषा या शंभर वर्षांपूर्वीच्या गृहीतकांवर आधारित असल्याने त्यामध्ये बदल करणे व अद्ययावत सर्वेक्षण करणे आवश्यक होते. यासाठी वारंवार मागणी करण्यात आली होती. त्या पार्श्वभूमीवर शासनाने नगरविकास, जलसंपदा, पर्यावरण, मदत व पुनर्वसन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेली समिती स्थापन केली आहे.

ही समिती पूरबाधित क्षेत्रांचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करणार असून, पूर्वाधित क्षेत्रातील बांधकामांची संख्या, जोते पातळी, नदीची वहन क्षमता, प्रवाहाची दिशा आदी तांत्रिक बाबींचा सखोल अभ्यास करून सरकारला शिफारशी करणार आहे. आवश्यकतेनुसार तज्ज्ञ संस्था व अधिकारी यांच्यासोबत बैठका घेऊन सर्वंकष अहवाल तयार करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे पिंपरी-चिंचवडसह राज्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, नव्या सर्वेक्षणामुळे नियमांमध्ये सुस्पष्टता येऊन विकास प्रक्रियेला गती मिळेल, असा विश्वास आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केला.

**नागरिकांना दिलासा मिळणार**

निळ्या पूररेषेत झालेली अधिकृत व अनधिकृत बांधकामे, तसेच यूडीसीपीआर, नियमांमुळे नवीन विकासकामांवर मर्यादा आल्या होत्या. त्यामुळे बांधकाम , परवानग्या, पुनर्विकास प्रस्ताव आणि मालमत्ता धारकांना अडचणींचा सामना, करावा लागत होता, समिती पूरबाधित क्षेत्रांचे मूल्यमापन करून बांधकामांची संख्या, जोते, पातळी, नदीची वहन क्षमता व प्रवाहाची दिशा यांचा अभ्यास करणार आहे. दोन महिन्यांत अहवाल सादर करून आवश्यक शिफारशी शासनाला देण्यात येतील. या निर्णयामुळे पिंपरी-चिंचवडसह राज्यातील नागरिकांना दिलासा मिळणार असून विकास प्रक्रियेला गती मिळेल, असा विश्वास आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केला.

## अंगणात खेळणाऱ्या 8 वर्षीय चिमुकलीवर अत्याचार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : पुण्यात माणुसकीला काळीमा फासणारी घटना;, संध्याकाळी ताप आल्यानंतर... पुण्यात माणुसकीला काळीमा फासणारी घटना; अंगणात खेळणाऱ्या 8 वर्षीय चिमुकलीवर अत्याचार(फोटो- महाराष्ट्र टाइम्स.कॉम) पुणे: घरासमोर खेळत असलेल्या एका आठ वर्षीय चिमुरडीवर गावातीलच एका अल्पवयीन मुलाने अत्याचार केल्याची धक्कादायक घटना पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात असणाऱ्या कान्हूर मेसाई या गावात उघडकीस आली. या प्रकरणी शिक्रापूर पोलिसांनी संशयित अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतलं असून, त्याच्यावर बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये (पोक्सो) आणि भारतीय दंड संहितेनुसार बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित बालिका घरासमोर खेळत होती. ती घरात एकटी असल्याचे पाहून संशयित आरोपी तिथे आला आणि त्याने या चिमुकलीवर अत्याचार केला. घडलेल्या प्रकाराबाबत कोणालाही न सांगण्याची धमकी देऊन तो तेथून पसार झाला. मात्र, सायंकाळी बालिकेला ताप येऊन प्रकृती बिघडल्याने पालकांनी तिला उपचारांसाठी तातडीने रुग्णालयात दाखल केलं. यावेळी तिच्यावर बलात्कार झाल्याचे तपासणीकरताना डॉक्टरांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी ही बाब पालकांना सांगितली. धक्का बसलेल्या पालकांनी मुलीला विश्वासात घेऊन विचारपूस केली असता तिने आपल्यासोबत घडलेला प्रकार सांगितला. पालकांनी तातडीने शिक्रापूर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### ओतूरच्या गाढवेपटात बिबट मादी जेरबंद

**ओतूर :** ओतूर परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या बिबट्याच्या हालचालींवर वनविभागाने वेळीच नियंत्रण मिळवले आहे. गाढवपट येथे लावण्यात आलेल्या पिंजऱ्यात गुरुवारी (दि.१९) पहाटे सुमारे ५.३० वाजण्याच्या सुमारास बिबट मादी जेरबंद झाली. ओतूर वनपरिक्षेत्र अधिकारी चैतन्य कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल श्रीमती एस. एम. बुट्टे, वनरक्षक के. एस. खरोडे (उदापूर) तसेच वनकर्मी किसन केदार यांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून जेरबंद बिबट मादीला सुरक्षितरीत्या माणिकडोह बिबट निवारा केंद्र येथे हलविण्यात आले आहे. वनविभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार पकडलेल्या बिबट मादीचे वय सुमारे १ ते १.५ वर्षे आहे. अलीकडे परिसरात पाळीव प्राण्यांवर हल्ल्यांच्या घटना व बिबट्याच्या हालचालींची नोंद होत असल्याने स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण होते. वनविभागाच्या या कारवाईमुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. वनविभागाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करताना, रात्रीच्या वेळी एकटे बाहेर न पडणे, लहान मुलांवर लक्ष ठेवणे व पशुधन सुरक्षित ठिकाणी ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत.

### मंचर नगरपंचायतीला राज्यात प्रथम

**मंचर :** पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या 'माझी वसुंधरा अभियान 5.0'मध्ये 1 जून 2024 ते 31 मार्च 2025 या कालावधीसाठी मंचर नगरपंचायतीने 15 हजार ते 25 हजार लोकसंख्या गटात राज्यस्तरावर प्रथम क्रमांक पटकाविला आहे. या पुरस्कारासोबत शहरास 3 कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर झाले आहे.
या दोन्ही अभियानांतर्गत मंचर शहरात दीड लाखापेक्षाही अधिक वृक्ष लागवड झाली आहे. अण्णासाहेब आवटे महाविद्यालय येथे मियावाकी टप्पा 1 व 2, अशा एकूण 15 एकर क्षेत्रावर आणि निघोटवाडी परिसरात बायोडायव्हर्सिटी पार्कमध्ये एक मियावाकी उद्यान उभारण्यात आले आहे. तसेच, आवटे महाविद्यालय परिसरातील तीनही बंधाऱ्यांची स्वच्छता करण्यात आली.

### इनामी लढतीला गालबोट; तासभर रंगलेली अटीतटीची झुंज, समर्थकाचा अचानक हस्तक्षेप

# कुस्तीच्या आखाड्यात हाय-व्होल्टेज ड्रामा!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पौड :** (ता. मुळशी) : कुस्तीचा आखाडा म्हणजे ताकद, तंत्र आणि शिस्तीचे प्रतीक. दोन बलाढ्य मल्ल आमनेसामने आले की प्रेक्षकांचा श्वास रोखला जातो. मात्र महाशिवरात्री निमित्त पौड येथे आयोजित मल्लिकार्जुन कुस्ती किताब स्पर्धेत रंगलेल्या ११ लाखांच्या इनामी लढतीला अनपेक्षित वादाचे गालबोट लागले. 'महाराष्ट्र केसरी' सिकंदर शेख आणि माऊली कोकाटे यांच्यात रंगलेल्या अटीतटीच्या झुंजीदरम्यान एका समर्थकाने थेट आखाड्यात घुसून सिकंदरवर हात उचलण्याचा प्रयत्न केल्याने एकच खळबळ उडाली.

१७ फेब्रुवारी रोजी पार पडलेल्या या लढतीसाठी परिसरासह राज्यभरातून कुस्तीप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आयोजकांनी ही लढत निकाली काढली जाईल, असे जाहीर केल्याने दोन्ही पैलवान पूर्ण ताकदीने मैदानात उतरले होते. सुरुवातीपासूनच झुंज चुरशीची झाली. दोघांनीही आक्रमक डावपेच राबवत एकमेकांवर तगडा दबाव टाकला. जवळपास तासभर रंगलेल्या या झुंजीत ताकदीबरोबरच मानसिक खंबीरतेचीही कसोटी लागली.

वेळ जसजसा पुढे सरकत गेला तसतसा सामना अधिकच तापला. माऊली कोकाटेने सिकंदरच्या मानेवर पकड घेत जोरदार दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. या चालीवरून दोघांमध्ये वादाची ठिणगी पडली. सिकंदरने जाब विचारताच काही क्षणांतच बाचाबाची सुरू झाली. पंचांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला, मात्र वातावरण तणावपूर्ण बनले.

याच दरम्यान आखाड्याच्या कडेला उभा असलेला माऊली कोकाटेचा एक समर्थक अचानक आत शिरला. काही समजण्याआधीच त्याने सिकंदर शेखकडे धाव घेत हात उचलण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार इतक्या वेगाने घडला की काही क्षण प्रेक्षकांनाही काय होत आहे, हे कळेना. प्रेक्षकांमध्ये संतापाची लाट उसळली, तर आयोजक व पंचांची धावपळ उडाली. काही वेळ आखाड्यात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

स्थिती चिघळण्याची शक्यता लक्षात घेऊन सिकंदर शेखचे गुरु विशाल हारगुळे स्वतः आखाड्यात उतरले. त्यांनी दोन्ही पैलवानांना शांत करत प्रेक्षकांनाही संयम राखण्याचे आवाहन केले. त्यांच्या हस्तक्षेपानंतर वातावरण काहीसे निवळले आणि सामना पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न झाला. मात्र तासभर चाललेल्या झुंजीमुळे आणि त्यानंतरच्या गोंधळामुळे स्पष्ट निकाल लावणे आयोजकांसमोर कठीण झाले. बराच वेळ चर्चा केल्यानंतर अखेर आयोजकांनी मध्यममार्ग स्वीकारत कुस्ती सोडवण्याचा निर्णय घेतला. दोन्ही पैलवानांना विजयी घोषित करण्यात आले. या निर्णयावर काही प्रेक्षकांनी समाधान व्यक्त केले, तर काहींनी स्पष्ट निकाल न लागल्याबद्दल नाराजी दर्शवली.

दरम्यान, या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला असून कुस्तीविश्वात त्याची जोरदार चर्चा सुरू आहे. पारंपरिक कुस्तीच्या मैदानात समर्थकांचा थेट हस्तक्षेप होणे ही गंभीर बाब मानली जात आहे. खेळाडूवृत्ती, शिस्त आणि सुरक्षेच्या दृष्टीने आयोजकांनी भविष्यात अधिक काटेकोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी व्यक्त होत आहे. कुस्तीच्या पवित्र आखाड्यातील हा हाय-व्होल्टेज ड्रामा मात्र दीर्घकाळ चर्चेत राहणार, हे निश्चित.

## पुण्यात 'मुले पळवणारी टोळी'ची अफवा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर "मुले पळवणारी टोळी पुण्यात सक्रिय आहे" अशा आशयाचे मेसेज, ऑडिओ क्लिप आणि व्हिडिओ मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहेत. या पार्श्वभूमीवर पुणे शहर पोलीस यांनी स्पष्ट केले आहे की, शहरात अशी कोणतीही टोळी अस्तित्वात नाही. हे संदेश पूर्णपणे निराधार असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, व्हायरल होत असलेले अनेक व्हिडिओ हे परराज्यातील जुने प्रकार असून काही फोटो एडिट करून प्रसारित केले जात आहेत. सोशल मीडियाच्या वेगवान युगात माहितीबरोबर भीतीही झपाट्याने पसरते. त्यामुळे पालकांमध्ये अनावश्यक घबराट निर्माण होत आहे.

**नागरिकांसाठी मार्गदर्शक सूचना**

पोलिसांनी नागरिकांना काही महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. कोणताही मेसेज फॉरवर्ड करण्यापूर्वी त्याची सत्यता गुगल किंवा पोलिसांच्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवर तपासावी. "जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवा" असे लिहिलेले संदेश बहुतांश वेळा फेक असतात. असे संदेश पुढे पाठवणे टाळावे, अन्यथा कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागू शकते.

तसेच, एखादी व्यक्ती संशयास्पद वाटल्यास तिचा व्हिडिओ काढून व्हायरल करण्याऐवजी तात्काळ ११२ या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधावा, असेही पोलिसांनी सांगितले. अफवा पसरवणाऱ्यांविरोधात सायबर गुन्ह्यांतर्गत कडक कारवाई केली जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

## कामगाराच्या हत्येतील आरोपीला अटींसह जामीन मंजूर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**येवलेवाडी :** येथील गणेश ज्वेलर्समध्ये २०१८ साली भरदिवसा झालेल्या थरारक गोळीबार प्रकरणात कामगार अमरत परिहार यांच्या हत्येतील आरोपीला अतिरिक्त सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधीश डी. आर. शेट्टी यांनी अटी व शर्तींसह जामिनाचे आदेश दिल्याची माहिती बचाव पक्षाचे वकील ॲड. जितेंद्र अशोक जानापुरकर यांनी दिली.

विकास सुरेश सिंग (रा. वैशाली, बिहार) असे जामिनावर सुटलेल्या आरोपीचे नाव आहे. ही घटना २१ नोव्हेंबर २०१८ रोजी दुपारी सुमारे दीड वाजता घडली होती.

माहितीनुसार, गणेश ज्वेलर्समध्ये काम करणारे अमरत परिहार काऊंटरवर असताना चार अनोळखी इसम दुकानात आले. काही वेळ संभाषण केल्यानंतर त्यापैकी एकाने पिस्तूलातून परिहार यांच्या छातीवर गोळी झाडली. गंभीर जखमी झालेल्या परिहार यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. आरोपी दोन मोटारसायकलवरून पसार झाले होते.

या प्रकरणी फिर्यादी दीपक दत्तू कामठे यांनी कोंढवा पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली होती. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी तपास करत विकास सिंग याला अटक केली. आरोपीविरुद्ध भादंवि कलम ३०२, ३०७, १२०(ब), ३४ तसेच आर्म ॲक्ट आणि महाराष्ट्र पोलीस ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. जामिनासाठी बचाव पक्षाने युक्तिवाद केला, तर सरकार पक्षाने विरोध दर्शविला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून न्यायालयाने आरोपीला अटींसह जामीन मंजूर केला. या निर्णयामुळे प्रकरण पुन्हा चर्चेत आले आहे.

### पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार; विजयसिंह शिंदे पाटील यांचे प्रेरणादायी प्रतिपादन

## खेड बाजार समितीत छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या छत्रपती शिवाजी महाराज बाजार आवारात गुरुवारी (दि. १९) छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. यावेळी बाजार समितीचे सभापती तथा नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य विजयसिंह शिंदे पाटील यांच्या हस्ते महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाला ज्येष्ठ नेते मारुती सातकर, बाजार समितीचे संचालक अशोक राक्षे, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष नरेंद्र थिगळे, ॲड. संतोष दाते, ॲड. प्रवीण बोंबले, सचिव बाळासाहेब धंद्रे, प्रशासकीय अधिकारी कैलास जफरे, सचिन धंद्रे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवभक्त व नागरिक उपस्थित होते. वातावरणात देशभक्तीपर घोषणा आणि जयघोषांनी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी बोलताना विजयसिंह शिंदे पाटील म्हणाले, "जगाच्या इतिहासात अजरामर ठरलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य, ध्येय आणि शौर्य हे संपूर्ण जगासाठी प्रेरणादायी आहे. त्यांची दूरदृष्टी, प्रशासनकौशल्य आणि स्वराज्याची संकल्पना आजही तितकीच महत्त्वाची आहे. तरुण पिढीने महाराजांचे विचार आत्मसात करून सत्य, संयम आणि धैर्य यांच्या बळावर जीवनातील प्रत्येक अडचणीवर मात करावी."

कार्यक्रमात यशराज पाचारणे यांनी महाराजांचा जोशपूर्ण पोवाडा सादर करून उपस्थितांची मने जिंकली. ढोल-ताशांच्या गजरात आणि घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुदाम कराळे यांनी केले.

**तालुकाभर उत्साहाची लाट**

दरम्यान, खेड तालुक्यातही छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. विविध गावांमध्ये शिवनेरी किल्ल्यावरून आणलेल्या मशाल ज्योतींचे भव्य स्वागत करण्यात आले. डीजे, ढोल-ताशा आणि पोवाड्यांच्या गजरात मिरवणुका काढण्यात आल्या. गावोगावी महाराजांच्या पुतळ्यांना आणि प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

अनेक प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये जयंतीनिमित्त विशेष सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी भाषणे, देशभक्तीपर गीते आणि चित्रकला स्पर्धांद्वारे महाराजांच्या जीवनकार्याला उजाळा दिला. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना स्वराज्य, शौर्य आणि राष्ट्रप्रेमाचे महत्त्व पटवून दिले. जयंती उत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण तालुक्यात उत्साह, अभिमान आणि प्रेरणेचे वातावरण निर्माण झाले होते. महाराजांच्या कार्याची आठवण करून देत समाजात एकजुटीचा आणि देशभक्तीचा संदेश देण्यात आला.

# मांजरीतील तिघा जिवाभावाच्या मित्रांचा अपघातात दुर्दैवी मृत्यू; गावावर शोककळा

### १२ ज्योतिर्लिंगांचे दर्शन करून परतताना गुजरातमध्ये भीषण अपघात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** बारा ज्योतिर्लिंगांचे दर्शन घेऊन आनंदाने परतणाऱ्या मांजरी बुद्रुक परिसरातील तीन जिवाभावाच्या मित्रांचा गुजरातमध्ये झालेल्या भीषण अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. तेजस दगडे, अभिषेक यादव आणि सचिन बिरादार अशी मृतांची नावे असून या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.


मिळालेल्या माहितीनुसार, हे तिघे मित्र गेल्या १८ दिवसांपासून देशभरातील १२ ज्योतिर्लिंगांच्या दर्शनासाठी प्रवास करत होते. धार्मिक भावनेतून सुरू केलेली ही तीर्थयात्रा पूर्ण करून ते पुण्याकडे परतत होते. मात्र, मंगळवारी पहाटे सुमारे दोनच्या सुमारास गुजरातच्या दाहोद जिल्ह्यातील इंदूर-अहमदाबाद महामार्गावरील धाधेला वळणावर त्यांच्या कारला अपघात झाला.

वेगात असलेली कार अचानक अनियंत्रित झाली आणि रस्त्याच्या दुभाजकावर जोरदार आदळली. धडक इतकी जबरदस्त होती की, कारचा अक्षरशः चक्काचूर झाला. अपघाताच्या तीव्रतेमुळे कारचे इंजिन तुटून रस्त्याच्या कडेला असलेल्या शेतात जाऊन पडले. या भीषण अपघातात दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला, तर गंभीर जखमी झालेल्या तिसऱ्या मित्राचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. तीघेही मित्र अत्यंत जिवाभावाचे असल्याने त्यांच्या अकाली निधनाने मांजरी बुद्रुक गावावर शोककळा पसरली आहे. धार्मिक यात्रेवरून परतताना काळाने झडप घातल्याने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. गावातील अनेकांनी त्यांच्या आठवणींना उजाळा देत श्रद्धांजली अर्पण केली. आनंदाच्या प्रवासाचा शेवट अशा दुर्दैवी घटनेत होणे ही अत्यंत वेदनादायक बाब असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

# लोणी काळभोर पोलीस ठाण्यात बदल्यांचा "बॉम्ब"

### एकाच आदेशात ३२ कर्मचाऱ्यांची उचलबांगडी; पुणे पोलिस दलात खळबळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** शहर पोलिस दलात मोठी खळबळ उडवणारा निर्णय समोर आला असून लोणी काळभोर पोलीस ठाण्यात बदल्यांचा अक्षरशः "बॉम्ब" पडला आहे. प्रशासकीय कारणास्तव एकाच वेळी तब्बल ३२ कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्याने संपूर्ण दलात चर्चांना उधाण आले आहे. हे आदेश पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी बुधवारी (ता. १८) रात्री उशिरा परिपत्रकाद्वारे जारी केले.

एकाच पोलीस ठाण्यातील एवढ्या मोठ्या संख्येने कर्मचाऱ्यांच्या बदल्या होणे ही दुर्मीळ बाब मानली जाते. त्यामुळे या निर्णयामागील नेमके कारण काय, अचानक एवढ्या मोठ्या प्रमाणावर हालचाल का करण्यात आली, याबाबत तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.

**काय आहे आदेशात?**

पुणे शहर पोलीस आयुक्तांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 मधील कलम २२ (एन) अन्वये हे आदेश दिले आहेत. या आदेशानुसार ३ सहाय्यक फौजदार, १० पोलीस हवालदार आणि १९ पोलीस अंमलदार यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
यामध्ये पोलीस अंमलदार इंद्रजीत जालिंदर डाडर यांची वैद्यकीय व कौटुंबिक अडचणींमुळे विनंतीनुसार बदली करण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले आहे. संबंधित सर्व कर्मचाऱ्यांना तत्काळ कार्यमुक्त करण्याचे निर्देश वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना देण्यात आले आहेत. तसेच बदली झालेल्या कर्मचाऱ्यांनी नव्या ठिकाणी रुजू झाल्यानंतर त्याचा अनुपालन अहवाल कार्यालयात सादर करणे बंधनकारक असल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

**कुठे झाली बदली?**

बहुसंख्य कर्मचाऱ्यांची बदली लोहगाव, विमानतळ, चंदननगर आणि सिंहगड रोड पोलीस ठाण्यांकडे करण्यात आली आहे. विशेष म्हणजे लोहगाव आणि विमानतळ पोलीस ठाण्यांकडे मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ हलविण्यात आले आहे. वाढती वस्ती, वाहतूक आणि सुरक्षा कारणांचा विचार करून हा निर्णय घेतला असावा, अशी चर्चा पोलिस वर्तुळात रंगली आहे. एकाच वेळी एवढ्या मोठ्या प्रमाणावर बदली आदेश निघाल्याने पोलिस दलात विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. काहीजण याकडे नियमित प्रशासकीय फेरबदल म्हणून पाहत असले, तरी काहींमध्ये या निर्णयामागील पार्श्वभूमीबाबत उत्सुकता आणि संभ्रम व्यक्त होत आहे.लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या दैनंदिन कामकाजावर काय परिणाम होणार, तसेच नव्या मनुष्यबळासह संबंधित ठाण्यांची कार्यपद्धती कशी बदलणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### कनेरसर येथे १० ते १५ जणांचा जमाव; लाकडी काठ्या-दगडांनी मारहाण-खेड पोलिसांत गुन्हा दाखल

# सेझ परिसरात कामाच्या वादातून युवकावर जीवघेणा हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर :** खेड तालुक्यातील औद्योगिक सेझ परिसरात कंपनीचे काम मिळवण्यावरून पुन्हा एकदा हिंसक वाद उफाळून आला आहे. कनेरसर गावात बुधवारी (दि. १८) दुपारी एका इंजिनिअरिंग कंपनीसमोर लँड डेव्हलपमेंटच्या कामावरून झालेल्या वादात १० ते १५ जणांच्या जमावाने २२ वर्षीय युवकावर जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात युवक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी खेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार, शेखर पोपट तांबे (वय २२, रा. वरुडे, ता. खेड) हा शेती व लँड डेव्हलपमेंटचा व्यवसाय करतो. दि. १८ फेब्रुवारी रोजी दुपारी सुमारे १ वाजता कनेरसर येथील 'के. ॲन्ड के. कॉन्टेक इंजिनिअरिंग प्रा. लि.' या कंपनीसमोर त्याचे काम सुरू होते. त्या वेळी काही जणांनी संबंधित कामावरून कंपनीचे अधिकारी सुंदरम यांच्याशी वाद घातला. परिस्थिती चिघळू नये म्हणून शेखर तांबे यांनी मध्यस्थी करत अधिकाऱ्यांना तेथून निघून जाण्यास सांगितले आणि वाद शांत करण्याचा प्रयत्न केला. मात्र, याच वेळी आरोपी सिद्धार्थ झोडगे याने "तुला खूप माज आला आहे, आम्हालाच येथे काम करायचे आहे," असे म्हणत शिवीगाळ करत तांबे यांच्यावर हल्ला चढवला. त्याने लाकडी काठीने पाठीवर व खांद्यावर वार केले. त्यानंतर जय चौधरी याने तोंडावर मुक्का मारून त्यांना खाली पाडले आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. जमावातील इतरांनीही दगड व काठ्यांनी बेदम मारहाण केली. डोक्यावर दगड मारल्याने तांबे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.

या प्रकरणी सिद्धार्थ झोडगे, जय चौधरी, मनोज मकाळे, कमलेश दौंडकर, संकेत दौंडकर, स्वागत माशेरे (सर्व रा. कनेरसर), तसेच इतर १० ते १५ अज्ञात इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भारतीय दंड संहितेच्या कलम ३४७ (बेकायदेशीर जमाव), ३२३ (स्वेच्छेने दुखापत), ३२४ (घातक शस्त्राने दुखापत), ५०६ (गुन्हेगारी धमकी) आदी कलमांनुसार कारवाई करण्यात आली आहे.

खेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सिसोदे पुढील तपास करीत आहेत. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करून पुरावे संकलित केले असून आरोपींचा शोध सुरू आहे.

परिसरात नव्याने येणाऱ्या उद्योगांमध्ये काम मिळवण्यासाठी पूर्वीही टोळीयुद्धाच्या घटना घडल्या असून काही प्रकरणांत खुनासारखे गंभीर गुन्हेही झाले आहेत. त्यामुळे या भागात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिकांनी दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. औद्योगिक क्षेत्रात कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांनी ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## 'भांडी' मागितल्याच्या कारणावरून ५८ वर्षीय व्यक्तीची हत्या

### वाघोलीतील धक्कादायक घटना; तरुण दाम्पत्य अटकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** शेजारधर्म आणि माणुसकीला काळिमा फासणारी धक्कादायक घटना वाघोली परिसरात घडली आहे. केवळ घरगुती भांडी आणि सामान परत मागितल्याच्या कारणावरून ५८ वर्षीय व्यक्तीची बेदम मारहाण करून हत्या करण्यात आली. भास्कर मोहन राठोड असे मृत व्यक्तीचे नाव असून, पोलिसांनी आनंद वर्मा (२६) आणि शीला वर्मा (२४) या तरुण दाम्पत्याला अटक केली आहे.

मूळचे परभणी जिल्ह्यातील जिंतूर येथील असलेले राठोड वाघोलीतील आव्हाळवाडी भागात भाड्याने राहत होते. शेजारी राहणाऱ्या वर्मा दाम्पत्याशी त्यांची ओळख होती. काही दिवसांपूर्वी राठोड यांनी आपली घरगुती भांडी व सामान शेजाऱ्यांकडे ठेवण्यासाठी दिले होते., १६ फेब्रुवारी रोजी त्यांनी ते सामान परत मागितले असता किरकोळ वाद निर्माण झाला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि दाम्पत्याने राठोड यांना बेदम मारहाण केली. गंभीर जखमी झालेल्या राठोड यांचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

## सारांश वृत्त

### मणिशंकर अय्यरांचा काँग्रेस नेतृत्वावर हल्लाबोल

**नवी दिल्ली :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री मणिशंकर अय्यर यांनी पक्ष नेतृत्वावर तीव्र टीका केली. १९८९ मध्ये राजीव गांधी यांनी लोकसभेत व्यक्त केलेल्या "केवळ धर्मनिरपेक्ष भारतच जगू शकतो" या विधानाचा पुनरुच्चार करण्याचे आव्हान त्यांनी काँग्रेस हायकमांडसमोर ठेवले.

केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांचे कौतुक केल्यानंतर आणि त्यांच्या पुनरागमनाची शक्यता व्यक्त केल्यामुळे अय्यर यांच्याविरोधात पक्षात नाराजी व्यक्त होत असतानाच त्यांनी यूट्यूबवर २३ मिनिटे १० सेकंदांचा व्हिडिओ प्रसिद्ध केला. या व्हिडिओत त्यांनी जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांच्या काळातील काँग्रेसमधील मतभेदांच्या परंपरेचा उल्लेख करत सध्याच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

इंदिरा गांधींच्या काळाचा संदर्भ देताना अय्यर म्हणाले की, मतभेद दडपल्यास त्याचे परिणाम गंभीर होतात. आणीबाणीनंतर झालेल्या निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला आणि इंदिरा गांधी व संजय गांधी यांनाही मतदारांनी नाकारले, असे त्यांनी नमूद केले. "काँग्रेस ही असंतोषाच्या आवाजामुळेच वाढली आहे," असे ते म्हणाले.

### सॉफ्टवेअर बिघाडामुळे प्रवाशांना अडचणी

**नवी दिल्ली :** सॉफ्टवेअर बिघाडामुळे एअरलाइन्सना गुरुवारी सकाळी विविध विमानतळांवर प्रवाशांची तपासणी करताना अडचणी आल्या. दिल्ली, मुंबई आणि इतर विमानतळांवर इंडिगो, एअर इंडिया एक्सप्रेस, स्पाइसजेट आणि अकासा एअर या विमानांवर परिणाम झाला आहे. सॉफ्टवेअर बंद पडल्यामुळे सकाळी ६.४५ ते ७.२८ वाजेपर्यंत चेक-इन सिस्टम बंद होती. या समस्येचे निराकरण करण्यात आले आणि यंत्रणेचे कामकाज पूर्वपदावर आले आहे, असे एका सूत्राने सांगितले.

### एआय समिटमध्ये डिजिटल क्रांतीचे कौतुक

# फ्रान्सच्या अध्यक्षांचे मॅक्रॉन यांचे जय हो...

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी दिल्लीत आयोजित 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट'मध्ये भारताच्या डिजिटल क्रांतीचे आणि सर्वसमावेशक विकास मॉडेलचे जोरदार कौतुक केले. गुरुवारी सकाळी शिखर परिषदेला संबोधित करताना त्यांनी भाषणाची सुरुवात 'नमस्ते'ने केली आणि शेवट 'जय हो'ने केला. जगातील अनेक देशांना जे साध्य करता आले नाही ते भारताने करून दाखवले आहे, असे त्यांनी नमूद केले. मुंबईतील रस्त्यावरील एका फेरीवाल्याचे उदाहरण देत मॅक्रॉन म्हणाले की, ही केवळ तांत्रिक प्रगती नाही तर एक सभ्यतेची कथा आहे. "दहा वर्षांपूर्वी मुंबईतील एका फेरीवाल्याजवळ बँक खाते, अधिकृत पत्ता किंवा कागदपत्रे नव्हती. आज तोच विक्रेता मोबाईलवर डिजिटल पेमेंट स्वीकारतो. हा बदल आश्चर्यकारक आहे," असे त्यांनी सांगितले. भारताच्या डिजिटल पायाभूत सुविधांबाबत बोलताना त्यांनी 'इंडिया स्टॅक'च्या क्षमतेवर प्रकाश टाकला. १४० कोटी नागरिकांना डिजिटल ओळख उपलब्ध करून देण्यात आली आहे, ही मोठी कामगिरी असल्याचे त्यांनी नमूद केले. यूपीआय प्रणालीचा विशेष उल्लेख करत त्यांनी दरमहा २० अब्जांहून अधिक व्यवहार हाताळण्याची क्षमता भारताने निर्माण केली असल्याचे सांगितले. याशिवाय ५० कोटींपेक्षा अधिक डिजिटल आरोग्य ओळखपत्रे जारी करण्यात आली असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. एवढ्या मोठ्या लोकसंख्येला डिजिटल अर्थव्यवस्थेशी जोडणे अशक्य आहे हा जगाचा समज भारताने खोटा ठरवला आहे, असे त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना उद्देशून सांगितले. कृत्रिम बुद्धिमत्ता केवळ काही मोठ्या तंत्रज्ञान कंपन्यांपुरती किंवा श्रीमंत देशांपुरती मर्यादित राहू नये, असा ठाम संदेश मॅक्रॉन यांनी दिला. तंत्रज्ञानाला मानवता आणि जबाबदारीशी जोडणारे देशच भविष्यात पुढे जातील, असे ते म्हणाले. भारत आणि फ्रान्स या दोन्ही देशांचा 'सार्वभौम एआय' या संकल्पनेबाबत समान दृष्टिकोन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. "गेल्या वर्षी पॅरिसमध्ये याला 'ॲक्शन' म्हटले जात होते, यावर्षी दिल्लीत 'इम्पॅक्ट' म्हणत आहोत. परंतु याचा खरा अर्थ आहे 'एआय टुगेदर'," असे ते म्हणाले. सहा दिवस चालणाऱ्या या परिषदेची संकल्पना 'सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय' अशी आहे. परिषदेत २० हून अधिक राष्ट्रप्रमुख सहभागी झाले आहेत. ५०० पेक्षा अधिक जागतिक एआय तज्ज्ञ आणि जवळपास १०० मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित आहेत. प्रेक्षकांमध्ये सॅम ऑल्टमन, सुंदर पिचाई, डेमिस हसाबिस आणि शंतनू नारायण यांसारख्या जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गजांचा समावेश होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही परिषदेला संबोधित करताना भारत कृत्रिम बुद्धिमत्ता क्रांतीचा केवळ भाग नाही तर तिचे नेतृत्व करत असल्याचे सांगितले. एआय सर्वांसाठी उपलब्ध असले पाहिजे, विशेषतः ग्लोबल साउथमधील देशांसाठी ते सक्षमीकरणाचे साधन ठरले पाहिजे, असे त्यांनी नमूद केले. जगातील एक षष्ठांश लोकसंख्या, सर्वात मोठी युवा पिढी आणि प्रचंड तांत्रिक प्रतिभा असलेला भारत एआयच्या क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मॅक्रॉन यांच्या भाषणातून भारताची ती प्रतिमा अधोरेखित झाली, जिथे तंत्रज्ञानाचा वापर केवळ आर्थिक फायद्यासाठी नव्हे तर समाजातील शेवटच्या घटकापर्यंत सक्षमीकरण पोहोचवण्यासाठी केला जात आहे.

## बिहारमध्ये नक्षल्याचे आत्मसमर्पण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पाटणा :** २५ वर्षांपासून फरार असलेला माओवादी कमांडर सुरेश कोडा उर्फ मुस्तकीम याने बुधवारी आत्मसमर्पण केले. त्यानंतर राज्यातील माओवादी चळवळीचा समूळ नायनाट झाल्याचा दावा बिहार पोलिसांनी केला आहे. मुंगेर जिल्ह्यात विशेष टास्क फोर्ससमोर कोडा यांनी शरणागती पत्करली. कोडा यांच्यावर तीन लाख रुपयांचे बक्षीस जाहीर होते. विविध जिल्ह्यांत त्यांच्याविरुद्ध सुमारे ६० गुन्हे दाखल होते. बिहार पोलिसांचे महासंचालक (ऑपरेशन्स) कुंदन कृष्णन यांनी सांगितले की, कोडा हा माओवादी पथकांचा शेवटचा सशस्त्र कमांडर मानला जात होता. कोडा हा स्पेशल एरिया कमिटीचे स्वयंघोषित कमांडर होते तसेच बंदी घातलेल्या भारतीय कम्युनिस्ट पक्ष (माओवादी)च्या बिहार-झारखंड विशेष झोनल कमिटीचे सदस्य होता. आत्मसमर्पण करताना दोन इन्सास रायफल, एक एके-४७, एक एके-५६ आणि ५०५ जिवंत काडतुसे पोलिसांच्या ताब्यात देण्यात आली. बीएमपी जवान, एसएसबी कर्मचारी, चौकीदार आणि पंचायत प्रतिनिधी यांच्या हत्येसह अनेक हिंसक घटनांत त्यांचा सहभाग असल्याचा आरोप आहे. जमुई, लखीसराय आणि मुंगेर जिल्ह्यांत बांधकाम कंपन्यांची वाहने जाळणे तसेच मजुरांचे अपहरण करणे अशा गुन्ह्यांतही त्याचा सहभाग असल्याचे पोलिसांनी सांगितले. या आत्मसमर्पणामुळे बांका, भागलपूर, गया, औरंगाबाद आणि नवादा परिसरातील माओवादी कारवायांवर मोठा परिणाम झाल्याचे पोलिस महासंचालकांनी नमूद केले. "हा ऐतिहासिक दिवस आहे. राज्यात आता एकही सशस्त्र माओवादी उरलेला नाही," असा दावा त्यांनी केला. पोलिसांच्या माहितीनुसार, २०१३ मध्ये राज्यातील २२ जिल्हे नक्षलवाद्यांच्या प्रभावाखाली होते. पुढील काळात ही संख्या १६ वर आली आणि २०२४ पर्यंत ती आठ जिल्ह्यांपर्यंत मर्यादित झाली. मुंगेर विभागाचे डीआयजी राकेश कुमार यांनी सांगितले की, राज्य सरकारच्या पुनर्वसन धोरणामुळे आणि एसटीएफ, पोलिस व प्रशासन यांच्या समन्वयामुळे हे आत्मसमर्पण शक्य झाले.

## मोफत' संस्कृतीवर सर्वोच्च न्यायालयाची तीव्र टिप्पणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** निवडणुकीपूर्वी विविध राज्य सरकारांकडून 'मोफत' योजनांच्या घोषणांची वाढती प्रवृत्ती किती काळ सुरू राहणार, असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी उपस्थित केला. अशा धोरणांमुळे देशाच्या दीर्घकालीन आर्थिक विकासाला बाधा येऊ शकते, अशी तोंडी टिप्पणी न्यायालयाने केली. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल पंचोली यांच्या खंडपीठासमोर तामिळनाडू पॉवर डिस्ट्रीब्यूशन कंपनी लिमिटेडने वीज दुरुस्ती नियम २०२४ मधील नियम २३ ला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सुनावणी सुरू होती. सुनावणीदरम्यान न्यायालयाने निवडणुकीआधी जाहीर होणाऱ्या कल्याणकारी योजनांवर व्यापक टिप्पणी केली. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी ज्येष्ठ वकील गोपाळ सुब्रमण्यम यांना उद्देशून म्हटले की, ज्यांना परवडते आणि ज्यांना परवडत नाही अशा सर्वांना एकसमान लाभ देणे हे तुष्टीकरणाचे धोरण ठरू शकते. "कल्याणकारी राज्य म्हणून वंचितांना मदत करणे समजण्यासारखे आहे. परंतु सर्वांना विनामूल्य लाभ देणे योग्य आहे का?" असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. न्यायालयाने नमूद केले की, अलीकडील निवडणुकांमध्ये मतदानाच्या आधीच विविध योजनांची अचानक घोषणा करण्यात आल्याचे दिसून आले आहे. थेट रोख हस्तांतरण योजना जाहीर केल्यास लोक काम करण्याची प्रेरणा गमावतील का, याबाबतही खंडपीठाने चिंता व्यक्त केली. सरन्यायाधीशांनी विचारले, "जर राज्य महसूल अधिशेषात असेल, तरी ती रक्कम रस्ते, रुग्णालये, शाळा, पायाभूत सुविधा यासाठी वापरणे हे त्यांचे कर्तव्य नाही का? त्याऐवजी निवडणुकीच्या तोंडावर मोफत वस्तूंचे वाटप केले जाते. आपण कोणती संस्कृती विकसित करत आहोत?" खंडपीठाने स्पष्ट केले की, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मदत करणे ही राज्याची जबाबदारी आहे.

### पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार; विजयसिंह शिंदे पाटील यांचे प्रेरणादायी प्रतिपादन

# आसाममध्ये भाजपसमोर हॅटट्रिकचे लक्ष्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**गुवाहाटी :** आसाममध्ये यंदा होणाऱ्या विधानसभा निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सत्ताधारी भाजपसमोर सलग तिसऱ्यांदा सत्ता राखण्याचे आव्हान आहे. पक्षाने येथे विजय मिळवला तर तो हॅटट्रिक ठरेल. यासाठी भाजपने जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी कार्यकर्त्यांना यावेळी ५० टक्के मतांचा टप्पा गाठण्याचे लक्ष्य दिले आहे.

२०२१ च्या निवडणुकीत भाजपला ३३.२ टक्के मते मिळाली होती. मतांच्या टक्केवारीत मोठी वाढ साध्य केल्यास विरोधकांना मर्यादित जागांवर रोखता येईल, असा पक्षाचा अंदाज आहे. मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांची लोकप्रियता आणि संघटनात्मक बळावर भाजप विश्वास ठेवून आहे. दुसरीकडे काँग्रेससाठी निवडणुकीचा मार्ग सोपा नाही. माजी प्रदेशाध्यक्ष भूपेन बोरा यांनी पक्ष सोडल्याने काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. त्यांच्या पाठोपाठ काही आमदार आणि नेते भाजपमध्ये जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे. यामुळे मतदारांमध्ये काँग्रेसची प्रतिमा कमकुवत होण्याची भीती आहे. महाजोत आघाडीतही अंतर्गत तणाव वाढलेला दिसतो. २०२१ च्या तुलनेत आघाडीची रचना बदलली आहे. एआययूडीएफ आणि बोडोलँड पीपल्स फ्रंट या पक्षांनी महाजोतपासून वेगळा मार्ग स्वीकारला आहे. बीपीएफ आता एनडीएत सहभागी आहे, तर एआययूडीएफ स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याच्या तयारीत आहे. याउलट आसाम जातीय परिषद आणि अखिल गोगोई यांचा समावेश महाजोतमध्ये झाला आहे. काँग्रेसने एजेपी आणि रायजोर दल या पक्षांना प्रत्येकी ११ जागांची ऑफर दिली असली तरी दोन्ही पक्ष अधिक जागांची मागणी करत आहेत. जागावाटपात तडजोड झाली नाही तर आघाडीची एकजूट ढासळण्याची शक्यता नाकारता येत नाही. राज्यात एप्रिलमध्ये मतदान होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत भाजप संघटनात्मक ताकदीवर आणि नेतृत्वाच्या प्रतिमेवर भर देत आहे, तर काँग्रेसला संघटनात्मक एकजूट आणि प्रभावी आघाडी रचना या दुहेरी आव्हानांचा सामना करावा लागत आहे. आसाममध्ये भाजपविरोधी मतांचे एकत्रीकरण झाले नाही तर एनडीएला पुन्हा सत्ता मिळवणे तुलनेने सोपे जाईल, असे राजकीय निरीक्षकांचे मत आहे.

# अनिल अंबानींना ईडीचे समन्स

### मनी लाँडरिंग प्रकरणी चौकशी तीव्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** रिलायन्स समूहाचे अध्यक्ष अनिल अंबानी यांना सक्तवसुली संचालनालयाने २६ फेब्रुवारी रोजी चौकशीसाठी हजर राहण्याचे समन्स बजावले आहे. मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायद्यानुसार त्यांचा जबाब नोंदवण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. या प्रकरणात टीना अंबानी यांनाही समन्स बजावण्यात आले होते. मात्र त्यांनी १० आणि १७ फेब्रुवारी रोजी हजर राहण्यास असमर्थता दर्शवली असल्याचे समजते. त्यांना नव्याने तारीख देण्यात आली आहे की नाही, याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नाही. न्यूयॉर्कमधील मॅनहॅटन भागात खरेदी करण्यात आलेल्या एका लक्झरी कॉन्डोमिनियमच्या व्यवहाराशी संबंधित मनी ट्रेलबाबत चौकशी सुरू आहे. या व्यवहारातील निधीचा स्रोत आणि व्यवहाराची रचना याचा तपास ईडी करत आहे. या प्रकरणात रिलायन्स कम्युनिकेशनचे माजी अध्यक्ष पुनीत गर्ग यांना अलीकडेच अटक करण्यात आली आहे. २०२३ मध्ये कंपनीच्या कॉर्पोरेट दिवाळखोरी निवारण प्रक्रियेदरम्यान न्यूयॉर्कमधील मालमत्ता फसवणुकीने विकल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. कंपनीने २०२५ मध्ये या व्यवहाराची माहिती स्टॉक एक्सचेंजला दिल्याचे सांगितले जाते. ईडीने यापूर्वी निवेदनात दावा केला होता की, सुमारे ८.३ दशलक्ष डॉलर्सची विक्री रक्कम रिझोल्यूशन प्रोफेशनलच्या माहिती किंवा संमतीशिवाय अमेरिकेतून पाठविण्यात आली. ही रक्कम दुबईस्थित आणि पाकिस्तानशी संबंधित व्यक्तीच्या नियंत्रणाखाली असलेल्या कंपनीमार्फत लबाडी गुंतवणूक योजनेच्या नावाखाली वळविण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार अनिल धीरूभाई अंबानी समूहाविरोधातील कथित बँक फसवणूक आणि आर्थिक अनियमिततेच्या चौकशीसाठी सीबीआयने विशेष तपास पथक स्थापन केले आहे. तपासाच्या अनुषंगाने सुमारे १२ हजार कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली असून, रिलायन्स समूहाच्या कंपन्यांविरोधात ईसीआयआर नावाच्या तीन तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत. या सर्व घडामोडींमुळे अंबानी समूहावरील तपासाची व्याप्ती वाढत असल्याचे स्पष्ट झाले आहे

# 'वंदे मातरम' सक्तीवर शशी थरूर यांचा आक्षेप

### देशभक्ती मनातून यावी, आदेशाने नव्हे

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** 'वंदे मातरम' गाणे कोणत्याही नागरिकावर सक्तीने लादू नये, असे मत काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी व्यक्त केले आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाने सर्व अधिकृत कार्यक्रमांमध्ये 'वंदे मातरम' अनिवार्य करण्याबाबत जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांवर त्यांनी टीका केली. देशभक्ती ही मनापासून व्यक्त व्हावी लागते; ती कायद्याने जिभेवर आणता येत नाही, असे ते म्हणाले. एका लेखात थरूर यांनी 'वंदे मातरम'च्या ऐतिहासिक भूमिकेचा उल्लेख केला. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी रचलेले हे गीत स्वातंत्र्यलढ्यात प्रेरणादायी ठरले. सत्याग्रहींना लाठीहल्ल्यांना सामोरे जाण्याचे बळ देणारे आणि क्रांतिकारकांच्या ओठांवर घुमणारे हे गीत असल्याचे त्यांनी नमूद केले. मात्र आज भारत एक धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताक आहे आणि राज्याची प्रतीके व वैयक्तिक विवेक यांच्यात संतुलन राखणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. स्वातंत्र्याच्या काळात काँग्रेस अधिवेशनांमध्ये 'वंदे मातरम' म्हटले जात असे, अशी आठवण करून देत थरूर म्हणाले की, देशाच्या धार्मिक विविधतेचा विचार करून 'जन गण मन' हे राष्ट्रगीत म्हणून स्वीकारण्यात आले. संविधान सभेने 'वंदे मातरम'ला स्वातंत्र्यलढ्यातील भूमिकेचा सन्मान म्हणून समान दर्जा दिला. ही विचारपूर्वक केलेली तडजोड होती, असे त्यांनी नमूद केले. रवींद्रनाथ टागोर यांच्या भूमिकेचा उल्लेख करताना थरूर म्हणाले की, १८९६ मध्ये टागोर यांनी हे गीत सादर केले होते. मात्र १९३७ मध्ये त्यांनी सार्वजनिक कार्यक्रमांत फक्त पहिले दोन कडवे गायली जावीत, अशी सूचना केली होती. सुरुवातीच्या ओळी मातृभूमीच्या नैसर्गिक सौंदर्याचे प्रतीकात्मक वर्णन करतात; परंतु पुढील कडव्यांत दुर्गा आणि लक्ष्मी यांसारख्या देवी-देवतांचा उल्लेख आहे. काही धर्मीय नागरिकांना धार्मिक कारणांमुळे हे भाग गाणे शक्य नसल्याचे त्यांनी नमूद केले. अनेक मुस्लिम नागरिकांचा आक्षेप तौहीदच्या संकल्पनेशी संबंधित असल्याचे थरूर यांनी सांगितले. इस्लाममध्ये एकेश्वरवाद मान्य असून इतर कोणासमोर नतमस्तक होणे स्वीकारले जात नाही. अशा परिस्थितीत संपूर्ण गीत अनिवार्य केल्यास काही नागरिकांना श्रद्धा आणि राज्य यांपैकी निवड करावी लागेल. धर्मनिरपेक्ष लोकशाहीत अशी परिस्थिती टाळली पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. सरकारच्या आदेशावर टीका करताना थरूर म्हणाले की, राष्ट्रीय एकात्मतेच्या नावाखाली सक्ती लादल्यास प्रतीकांची ताकद कमी होऊ शकते. कोणत्याही प्रतीकाचे महत्त्व हे स्वेच्छेने व्यक्त होणाऱ्या आदरात असते. राज्य जर निष्ठेची तोंडी अभिव्यक्ती लादत असेल, तर ती भावना पोकळ ठरू शकते, असा इशाराही त्यांनी दिला.

### केरळ ते आसाम गटबाजीचे सावट, राहुल गांधींसमोर कठीण परीक्षा

# निवडणूक असलेल्या राज्यांत काँग्रेससमोर आव्हान

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षासमोर संघटनात्मक आणि आघाडी राजकारणाची दुहेरी कसरत उभी राहिली आहे. केरळ, आसाम, तामिळनाडू आणि पश्चिम बंगालसारख्या महत्त्वाच्या राज्यांत वाढती गटबाजी, नेतृत्वावरील प्रश्न आणि मित्रपक्षांशी वाढता तणाव यामुळे केंद्रीय नेतृत्वाची चिंता वाढल्याचे दिसते. केरळमध्ये काँग्रेसला सत्तेची संधी मिळेल, अशी अपेक्षा असताना ज्येष्ठ नेते मणिशंकर अय्यर यांच्या वक्तव्याने पक्ष अस्वस्थ झाला आहे. मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांच्या नेतृत्वाखालील एलडीएफ सरकार सलग तिसऱ्यांदा सत्तेवर येऊ शकते, असे अय्यर यांनी म्हटले. त्यांच्या मते विजयन यांची कारकीर्द प्रभावी ठरली आहे. या वक्तव्यामुळे यूडीएफच्या विजयासाठी प्रयत्नशील असलेल्या काँग्रेसच्या राज्य नेतृत्वाला अडचणीत आणले आहे. केरळमध्ये परंपरेने पाच वर्षांनी सत्ता बदलत आली आहे. मात्र २०२१ मध्ये एलडीएफने पुन्हा सत्ता मिळवत ही परंपरा मोडली. अय्यर यांच्या विधानामुळे काँग्रेसच्या पुनरागमनाच्या प्रयत्नांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आसाममध्ये काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष भूपेनकुमार बोरा यांनी दिलेला राजीनामा आणि त्यानंतरची घडामोडी पक्षातील अंतर्गत तणाव उघड करतात. बोरा यांनी केंद्रीय नेतृत्वाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला. काही स्थानिक निर्णयांबाबत त्यांनी नाराजी व्यक्त केली होती. राहुल गांधी आणि उच्च नेतृत्वाच्या हस्तक्षेपानंतर त्यांनी राजीनामा मागे घेतला असला तरी अस्वस्थता कायम असल्याचे मानले जाते. आसाममध्ये मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाखाली भाजप मजबूत स्थितीत आहे. काँग्रेसमध्ये संघटनात्मक मतभेद, अल्पसंख्याक नेतृत्वाची नाराजी आणि आघाडीच्या समीकरणांतील गोंधळ यामुळे पक्षाची रणनीती कमकुवत झाल्याची चर्चा आहे. २०१५ मध्ये सरमा यांनी काँग्रेस सोडून भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर राज्यातील राजकीय समीकरणे बदलली होती. त्या पार्श्वभूमीवर काँग्रेसला एकसंध राहण्याची गरज अधिक आहे. तामिळनाडूत काँग्रेस द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडीत सहभागी आहे. मात्र जागावाटप आणि सत्तावाटपाबाबत तणाव वाढल्याचे संकेत मिळत आहेत. मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी निवडणुकीनंतर सत्तावाटपाचा प्रश्न उपस्थित होणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. काँग्रेसच्या काही नेत्यांनी अधिक जागांची मागणी केल्याने आघाडीत मतभेद उघड झाले. राज्यात अभिनेता विजय यांच्या पक्षाच्या उदयानंतर राजकीय समीकरणे आणखी गुंतागुंतीची झाली आहेत. द्रमुकपासून वेगळा पर्याय काँग्रेससमोर नाही, हे वास्तव असले तरी आघाडीतील असमतोलामुळे पक्षाची स्थिती अवघड झाली आहे. पश्चिम बंगालमध्ये काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेस यांच्यातील संबंध ताणले गेले आहेत.

## उत्तराखंड उच्च न्यायालयाची आकडेवारी जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**डेहराडून :** अधीनस्थ न्यायपालिकेतील सदस्यांविरुद्ध दाखल झालेल्या तक्रारींची एकूण आकडेवारी उत्तराखंड उच्च न्यायालयाने जाहीर केली आहे. जानेवारी २०२० ते एप्रिल २०२५ या कालावधीत न्यायाधीश आणि न्यायिक अधिकाऱ्यांविरुद्ध २५८ तक्रारी दाखल झाल्याची माहिती समोर आली आहे. यापैकी चार न्यायिक अधिकाऱ्यांविरुद्ध औपचारिक कारवाई सुरू करण्यात आल्याचे उच्च न्यायालयाच्या जनमाहिती अधिकाऱ्याने स्पष्ट केले.

ही माहिती भारतीय वन सेवा अधिकारी आणि मॅगसेसे पुरस्कार विजेते संजीव चतुर्वेदी यांनी माहिती अधिकार कायद्यांतर्गत मागवली होती. राज्य माहिती आयोगाच्या निर्देशानंतर उच्च न्यायालयाच्या दक्षता कक्षाने आकडेवारी सार्वजनिक केली. न्यायालयीन गैरवर्तनाच्या तक्रारींबाबत एकत्रित माहिती जाहीर करण्याचे हे दुर्मिळ उदाहरण मानले जात आहे, कारण अशा बाबी सामान्यतः गोपनीय ठेवण्यात येतात. चतुर्वेदी यांनी मे २०२३ मध्ये प्रथम आरटीआय अर्ज दाखल करून भ्रष्टाचाराच्या तक्रारी कोण हाताळतात आणि अशा किती तक्रारी प्राप्त झाल्या याची माहिती मागितली होती. सुरुवातीला उच्च न्यायालयाच्या जनमाहिती अधिकाऱ्याने गोपनीयता आणि तृतीय पक्ष माहितीचा दाखला देत ही माहिती नाकारली. पहिल्या अपीलनंतरही माहिती देण्यात आली नव्हती. मुख्य माहिती आयुक्त राधा रतूरी यांच्या हस्तक्षेपानंतर प्रकरणाला गती मिळाली. सुनावणीदरम्यान तपशील देता येणार नसल्याचे सांगितले,. सरन्यायाधीशांच्या मंजुरीनंतर आकडेवारी जाहीर करण्यास सहमती दर्शवली.